




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com









# अखेर युद्ध थांबले, इराणकडून शस्त्रसंधीचा निर्णय जाहीर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** इस्त्रायल आणि इराण दरम्यान गेल्या १२ दिवसांपासून सुरु असलेले युद्ध थांबले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्त्रायल आणि इराण दरम्यान शस्त्रसंधी झाल्याची घोषणा सोशल मीडियाच्या माध्यमातून केली होती. त्यानंतर इराणने डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा खोडून काढत शस्त्रसंधी झाली नसल्याचे म्हटले होते. परंतु अखेर इराणने शस्त्रसंधी झाल्याचा निर्णय जाहीर केला. इराणच्या सरकारी टीव्ही चॅनलने इस्त्रायलसोबतचे युद्ध थांबल्याचे जाहीर केले. दुसरीकडे इस्त्रायलकडून इराणी हल्लासंदर्भात अलर्ट मागे घेण्यात आला आहे. नागरिकांना बंकरमधून बाहेर येण्याची परवानगी देण्यात आली आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीनंतर इराण आणि इस्त्रायल या दोन्ही देशांनी युद्धबंदीसाठी सहमती दर्शविली होती. परंतु युद्धबंदी लागू झाल्यानंतरही इराणकडून इस्त्रायलवर बॉम्बहल्ला करण्यात आला. त्यामुळे संशयाची परिस्थिती निर्माण झाली होती. इस्त्रायली संरक्षण दलाने म्हटले होते की, इराणने एका तासात तीन वेळा क्षेपणास्त्र हल्ले



केले आहेत आणि त्यात चार नागरिकांचाही मृत्यू झाला आहे. इस्त्रायलमध्ये हल्ल्यामुळे तेल अवीवमध्ये सायरन वाजवण्यात आले आणि लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले.

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी म्हटले होते की, आमचे शक्तीशाली लष्कर शेवटच्या क्षणापर्यंत इस्त्रायलला धडा शिकवणार आहे. मी आमच्या सशस्त्र दलाचे कौतूक करतो. त्यांनी पराक्रमांची पराकाष्टा करत आपल्या देशाची सेवा केली. आपले सैन्य दल रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत देशाच्या संरक्षणासाठी तयार असते.

इस्त्रायल आणि इराण दरम्यान १३ जूनपासून युद्ध सुरु झाले आहे. या युद्धात इराणचे तीन प्रमुख अणू प्रकल्प फोर्डो, नतांज आणि इस्फहानवर अमेरिकेने बंकर बस्टरने हल्ले केले. इराणचे लष्करप्रमुख हुसैन सलामीसह इतर सैन्य कमांडर्स आणि अणूशास्त्रज्ञांचा मृत्यू झाला. तसेच इराणमधील जवळपास एक हजार जणांचा मृत्यू झाला. इराणमधील पायाभूत सुविधांचेही मोठे नुकसान झाले. या युद्धात इराणला कोणाचीही सोबत मिळाली नाही. चीन-रशियासारख्या देशांनी नैतिक पाठिंबा दिला. परंतु उघडपणे या दोन्ही देशांनी इराणला पाठिंबा दिला नाही.

युद्धबंदीबाबत डोनाल्ड ट्रम्प आणि नेत्यानाहू यांच्या फोनवर चर्चाही झाली. हल्ले न करण्याची अट इराणने मान्य केल्यावर युद्धबंदीची घोषणा करण्यात आलीय. ट्रम्प यांनी घोषणा केल्यावर इराणनेही युद्धबंदीच्या वृत्ताला पुष्टी दिलीय. १३ जूनला इस्त्रायलने इराणवर हल्ले केल्यावर गेले १२ दिवस दोन्ही देश एकमेकांवर भयंकर प्रहार करत होते. तेल अवीवपासून तेहरानपर्यंत रोज प्रचंड हानीची माहिती समोर येत होती. इस्त्रायल आणि इराण दोघेही माघार घेत नव्हते. इराणला नमवण्यासाठी अमेरिकेलाही यात पडावं लागलं होतं. त्यामुळे चीन रशिया नाराज होत व्यापक युद्धाचे ढग जमा होऊ लागले होते.

## नांदेडसह मराठवाड्यात पुढील पाच दिवस पावसाची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यभरात पुढील पाच दिवस पावसाला पोषक स्थिती तयार झाली असून मराठवाड्यात आजपासून २८ जूनपर्यंत पावसाची हजेरी राहणार असल्याचं प्रादेशिक हवामान केंद्रानं सांगितलं आहे. मराठवाड्यात अनेक भागात वादळी वारा व मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी पेरणीच्या हलचाली कराव्यात की नाही? पीक व्यवस्थापन कसे करावे यासंदर्भात वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथून कृषी हवामान आधारित कृषी सल्ला देण्यात आला आहे.

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार दि. २५ जून रोजी छत्रपती संभाजी नगर, जालना, नांदेड, परभणी व हिंगोली जिल्हयात, दि. २६ जून रोजी छत्रपती संभाजी नगर व जालना जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ३० ते ४० कि.मी.) राहून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात दि. २५ जून रोजी काही ठिकाणी तर दिनांक २६ व २७ जून रोजी तूरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या तर २८ जून रोजी तूरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील चार ते पाच दिवसात कमाल व किमान तापमानात फारशी तफावत जाणवनार नाही.

# महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गाला गती, २० हजार ७८७ कोटींची तरतूद

### नांदेडसह राज्यातील १२ जिल्ह्यांना जोडणारा ८०२ कि.मी.चा द्रूतगती मार्ग

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याच्या पूर्वेकडील पवनार (जि.वर्धा) येथून ते पश्चिमेकडील पत्रादेवी (जि.सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र-गोवा सीमेला जोडणाऱ्या महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग (शिघ्रसंचार द्रूतगती मार्ग) प्रकल्पाला गती देण्यासाठी २० हजार ७८७ कोटी रुपयांच्या तरतुदीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील १२ जिल्ह्यांना जोडणारा हा द्रूतगती मार्ग ८०२.५९२ किलोमीटर लांबीचा असणार आहे.

महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग राज्यातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यांना जोडणार आहे. पुढे तो कोकण द्रूतगती महामार्गास गोवा-महाराष्ट्र सीमेवर जोडला जाणार आहे. या महामार्गामुळे राज्यातील प्रमुख शक्तीपीठे माहुर, तुळजापूर व कोल्हापूर तसेच अंबेजोगाई ही तीर्थक्षेत्रे जोडली जाणार आहेत. तसेच संतांची कर्मभूमि असलेले मराठीचे आद्यकवी अंबेजोगाईस्थित मुकूंदराज स्वामी, जोगाई देवी तसेच १२ ज्योर्तिलिंगापैकी २ औंढानागनाथ व परळी वैजनाथ, महाराष्ट्राचे आराध्य पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, यासह कारंजा-लाड, अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर ही दत्त गुरूंची धार्मिक स्थळे जोडली जाणार आहेत. या महामार्गामुळे नागपूर ते गोवा हे १८ तासांच्या प्रवासाचे अंतर ८ तासांवर येणार आहे.

या प्रकल्पाच्या भूसंपादनाकरिता हुडकोकडून १२ हजार कोटींचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. या निधीतून सुमारे ७ हजार ५०० हेक्टरचे भूसंपादन करण्यात येणार आहे. हा संपूर्ण प्रकल्प महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणार आहे. हा महामार्ग महाराष्ट्रातील शक्तीपीठांना एकत्र जोडण्याचा प्रयत्न असून, त्यातून पर्यटन, वाहतूक व ग्रामीण भागाचा विकास साधण्याचे उद्दिष्ट आहे.

## हिंदी भाषेबाबत अंतिम निर्णय सात दिवसांत

**मुंबई (प्रतिनिधी)–** पहिलीपासून हिंदी भाषा लागू करण्यासाठी राज्यातील विरोध लक्षात घेता राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. हिंदी भाषेबाबतचा अंतिम निर्णय पुढच्या सात दिवसांमध्ये घेतला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या दरम्यान शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे हे हिंदीला भाषेला विरोध करणारे राजकीय पक्ष, नेते, संघटना, भाषातज्ज्ञ यांच्यासोबत बैठक घेणार आहेत.

दादा भुसे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, इतर राज्यांची भाषा, त्यांचे धोरण, हिंदीबाबतचे धोरण याबाबत सरकारची बाजू समजावून सांगणार आहेत. तसेच याला विरोध करणाऱ्यांची नेमकी भूमिका काय याची माहितीही घेणार आहेत. त्यानंतर याविषयी समग्र अहवाल तयार करून सरकार निर्णय घेणार असल्याची माहिती आहे. पहिलीपासून त्रिभाषा सूत्रावर ठाम असणाऱ्या सरकारनं आता एक पाऊल मागे घेतल्याचं चित्र आहे. या संदर्भात सर्व राजकीय नेते आणि तज्ज्ञांशी चर्चा करण्याची भूमिका घेतली आहे.

# अवैध वाळू माफियांची दादागिरी; महिला नायब तहसीलदारांशी अरेरावी करत हुज्जत

### कंधारमध्ये दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** अवैध वाळू उपसा करून वाहतूक करणाऱ्या हायवा मालकाने महिला नायब तहसीलदारांसोबत अरेरावी करत हुज्जत घातली. तसेच त्यांच्या चालकासोबत धक्काबुक्की करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. ही घटना दि. २३ जून रोजी सायंकाळी सातच्या सुमारास घोडजघाट ते घोडज तांडा रस्त्यावर घडली.

कंधार तालुक्यातील घोडज तांडा ते घोडजघाट रस्त्यावरुन अवैध वाहतूक होत असल्याची माहिती कंधारच्या नायब तहसीलदार रेखा चामनर यांना मिळाली. त्यांनी आपले शासकीय वाहन घेऊन त्या ठिकाणी कारवाई करण्यासाठी गेल्या. यावेळी अवैध वाळू वाहतूक करणारा ऋषी जाधव हायवा मालक आणि कार चालकाने संगणमत करून आमची हायवा का पकडली असे म्हणून वाद घातला. तसेच तहसीलदार यांना अरेरावी करत त्यांच्यासोबत हुज्जत घालत त्यांच्या समोरच हायवा सुसाट वेगाने पळवून नेली. एवढेच नाही तर त्यांच्या चालकास धक्काबुक्की करत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. नायब तहसीलदार रेखा चामनर यांच्या फिर्यादीवरून कंधार पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी वरील दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक कोकाटे करत आहेत.

## मनसे-शिवेसना ठाकरे गटाच्या नेत्यांची आज एकत्र पत्रकार परिषद

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात गेल्या काही काळापासून मनसे आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या युतीबाबत चर्चा चालू आहे. दोन्ही बाजूंनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. यानंतर आता मनसे आणि ठाकरे गटाचे महत्त्वाचे नेत आज (२५ जून) एकत्र पत्रकार परिषद घेणार आहेत. अर्थात ही पत्रकार परिषद युतीसंदर्भातील चर्चेवर नसली तरी दोन्ही पक्षांचे नेते त्यानिमित्ताने एकत्र येणार असल्याने वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. तसेच या पत्रकार परिषदेत दोन्ही नेते नेमकं काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मनसे आणि ठाकरे गट आज २५ जूनला एकत्र पत्रकार परिषद घेणार आहेत. या परिषदेला शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत आणि मनसेचे माजी आमदार नितीन सरदेसाई संबोधित करणार आहेत. इंडिगो एअरलाइन्स कर्मचाऱ्यांबाबत भाजपच्या कामगार युनियनने केलेला खोटारडेपणा हे दोन्ही नेते उघड करणार आहेत. उद्या दुपारी ठीक १२.३० वाजता ही पत्रकार परिषद पार पडणार आहे. मनसे आणि ठाकरे गटाने इंडिगो अंतर्गत येणाऱ्या अजाईल कंपनीच्या विरोधात १८ जूनला एकत्र आंदोलन केले होते.

## अजित पवारांच्या खात्यांवर लक्ष ठेवा, त्यांच्याकडे १४-१४ हजार कोटींचे दोन निधी, एकनाथ शिंदेंचे सेना आमदारांना आदेश



**मुंबई (प्रतिनिधी)–** अजित पवार निधी देत नाही असा नाराजीचा सूर लावलेल्या शिवसेनेच्या मंत्र्यांना एकनाथ शिंदे यांनी आदेश दिला आहे. अजित पवारांच्या खात्याकडे मोठा निधी आहे, त्यावर लक्ष ठेवा. तो निधी कुठे वितरित होतो याची माहिती घ्या असा आदेश एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मंत्र्यांना दिल्याची माहिती आहे. कॅबिनेटच्या बैठकीनंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांची वेगळी बैठक घेतली. त्यामध्ये निधी वाटपावरुन शिंदेंच्या मंत्र्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याची माहिती आहे.

महायुती सरकारच्या तीन घटक पक्षांमध्ये निधी वाटपासंबंधी सातत्याने धुसफूस सुरू असल्याचं दिसून येतंय. त्यातही शिंदेंच्या शिवसेनेच्या मंत्र्यांनी अर्थमंत्री अजित पवार यांच्याविषयी अनेकदा नाराजी व्यक्त केली आहे. त्याच पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मंत्र्यांची स्वतंत्र बैठक घेतली.

राज्यातील निधी वाटपावरुन एकनाथ शिंदे आक्रमक झाल्याचं दिसून आलं. अजित पवारांच्या खात्यावर बारकाईनं लक्ष ठेवा असा आदेश त्यांनी मंत्र्यांना दिला. अजित पवारांच्या खात्यात १४-१४ हजार कोटींचे दोन निधी आहेत. त्यावर लक्ष ठेवल् पाहिजे. हा निधी कुठे वितरीत होत आहे यांची माहिती आपल्याला मिळाली पाहिजे असं एकनाथ शिंदे म्हणाले.

जे आपल्या हक्काचं आहे ते घेतलंच पाहिजे असा आदेश एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांना दिला. त्यामुळे आता अजित पवारांच्या अर्थखात्यावर शिवसेनेचा वॉच असेल अशी चर्चा सुरू आहे.

निधी वाटपाच्या मुद्द्यावरून मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केल्यानतंर एकनाथ शिंदे यांनी अजित पवारांची भेट घेतली. त्या आधी शिंदेंचे मंत्री उदय सामंत यांनीही अजित पवारांची भेट घेतली होती. या भेटीमध्ये निधी वाटपावरुन चर्चा झाल्याची माहिती आहे.

## १ जुलैपासून रेल्वे प्रवास महागण्याची शक्यता

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** तुम्ही जर रेल्वेनं प्रवास करत असाल तर तुमच्यासाठी महत्त्वाची अपडेट आहे. पुढील महिन्यात रेल्वे प्रवाशांना एक्स्प्रेस गाड्यांमधून प्रवास करायचा असेल तर अधिक पैसे मोजावे लागू शकतात. भारतीय रेल्वेनं करोनाच्या काळानंतर पहिल्यांदा रेल्वेच्या प्रवास भाड्यात वाढ करण्याचा निर्णय घेतला असल्याचे बोलले जातआहे. रेल्वे प्रवास भाड्यात किरकोळ वाढ होणार असून ती १ जुलैपासून लागू केली जाणार असल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार नॉन एसी मेल आणि एक्स्प्रेस ट्रेनच्या प्रवास भाड्यात १ पैसे प्रति किलोमीटर वाढ होणार आहे. एसी क्लाससाठी प्रवास भाड्यात २ पैसे प्रति किलोमीटर वाढ होणार आहे. मात्र, ५०० किलोमीटरपर्यंतच्या उपनगरीय तिकीट किंवा सेकंड क्लासच्या प्रवास भाड्यात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

# एसटी महामंडळाचा कामगार अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील राज्य परिवहन विभागात (एसटी महामंडळ) कार्यरत असलेल्या कामगार अधिकाऱ्याविरुद्ध लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्यात दि. २३ जून रोजी गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदाराविरुद्ध असलेल्या विभागीय चौकशीत शिक्षा कमी करुन दिल्याचा मोबदला म्हणून कामगार अधिकारी लक्ष्मीकांत विठ्ठलराव गवारे याने विभागीय वाहतूक अधिकारी क. बा. भारती यांना ७ हजार रुपये द्यावे लागतील, अशी बतावणी तक्रारदाराकडे



२ मे २०२५ रोजी केली होती. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने नांदेड लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे रितसर तक्रार नोंदविली होती. त्यानंतर ८ मे रोजी पडताळणीत आरोपी लोकसेवक गवारे याने पैशांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

दरम्यान, १६ मे, २ जून व १७ जून रोजी सापळा कारवाईचे आयोजन केले. परंतु कुणकुण लागल्याने आरोपी लोकसेवकाने तक्रारदाराकडून तिन्ही वेळा लाच प्रत्यक्ष स्वीकारली नाही. मात्र लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्या आधारे दि. २३ जून रोजी लक्ष्मीकांत गवारे याच्या विरुद्ध भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला. आरोपीस अद्याप अटक झाली नाही. ही कारवाई पोलीस निरीक्षक गजानन बोडके, पोहेकॉ राजेश राठोड, बच्चेवार, सय्यद खदीर, ईश्वर जाधव, प्रकाश मामुलवार यांच्या पथकाने केली.

## खाद्य तेलाच्या किंमती वाढल्या

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** इराण-इस्त्रायल संघर्ष थांबण्याची सध्या चिन्ह दिसत नाहीत. या दोन्ही देशात संघर्ष सुरू असतानाच अमेरिका सुद्धा त्यात उतरली आहे. या युद्ध भडकू नये यासाठी सर्वच देश प्रयत्न करत आहेत. शांततेसाठी बोलणी सुरू असली तरी हल्ले-प्रतिहल्ले सुरूच आहे. युद्धाचे परिणाम आता भारतावर सुद्धा दिसू लागले आहे. पेट्रोल-डिझेल आणि गॅस सिलेंडर महागण्याचा दावा करण्यात येत असतानाच आता खाद्यतेलाने महागाईच्या मोर्चावर पहिली आघाडी उघडली आहे.






## आणीबाणी काळात लढा देणाऱ्या व्यक्तींचा मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र देऊन होणार गौरव

**नांदेड (प्रतिनिधी)–** सन २५ जून १९७५ ते ३१ मार्च १९७७ या कालावधीत घोषत आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर लोकशाही मुल्यांच्या रक्षणासाठी लढा देणाऱ्या आणि त्यासाठी बंदिवास सोसावा लागला अशा व्यक्तींचा सन्मान, यथोचित गौरव करण्यात येणार आहे. यानुसार अशा आणीबाणीधारकांना बुधवार, दि. २५ जून २०२५ रोजी संबंधीत जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यानुषंगाने २५ जून रोजी मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र वितरीत करण्याच्या सभारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड, लोहा, कंधार, मुदखेड, हदगाव तालुक्यातील हयात आणीबाणीधारक किंवा त्यांच्या वारस पत्नी यांना बैठक कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे सकाळी ११ वा. न चुकता उपस्थित राहण्याबाबत संबंधित तहसिलदार यांच्या स्तरावरुन कळविण्यात आले आहे. संबंधित तालुक्यातील हयात आणीबाणी धारक किंवा त्यांच्या वारस पत्नी यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पहिल्या कसोटी सामन्यात इंग्लंडचा विजय

**लीड्स (वृत्तसंस्था)–** हेडिंग्ले मैदानावर खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात टीम इंडियाला दारुण पराभवाचा सामना करावा लागला आहे. पहिल्या आणि दुसऱ्या डावात भारतीय फलंदाजांनी शानदार कामगिरी करत एकूण ५ शतके झळकावली, परंतु तरीही टीम इंडिया सामना वाचवू शकली नाही. इंग्लंडने चौथ्या डावात ३७१ धावांचे मोठे लक्ष्य गाठून कसोटी क्रिकेटमध्ये इतिहास रचला. शेवटच्या दिवशी ३५२ धावा करून इंग्लंडने विजय मिळवला.

यशस्वी जयस्वाल, कर्णधार शुभमन गिल आणि ऋषभ पंत यांनी पहिल्या डावात शानदार शतके केली. जयस्वालने १०१, गिलने १४७ आणि पंतने १३४ धावा केल्या. केएल राहुल (१३७) आणि ऋषभ पंत (११८) यांनीही दुसऱ्या डावात चांगली कामगिरी केली. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या संघाची ५ शतके असूनही कसोटी सामन्यात पराभव स्वीकारावा लागला आहे.

# महाराष्ट्र शासनाकडून २०१९-२३ चे पत्रकारिता पुरस्कार जाहीर

- संदीप काळे यांना २०१९ चा राज्यस्तरीय बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार
- नांदेडचे सचिन मोहिते यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट वृत्तपत्र छायाचित्र पुरस्कार
- प्रविण टाके यांना शासकीय गटातून यशवंतराव चव्हाण पुरस्कार
- परभणीचे पंकज क्षीरसागर यांना पु.लं. देशपांडे दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** महाराष्ट्र शासनाने २०२१, २०२२ आणि २०२३ या वर्षांसाठीच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारांची आज घोषणा केली. राजधानी दिल्लीतून महाराष्ट्र टाईम्सचे सहायक संपादक मंगेश वैशंपायन यांची वर्ष २०२१ साठीच्या प्रतिष्ठित 'अटल बिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार' साठी आणि वरिष्ठ पत्रकार निवेदिता खांडेकर यांची वर्ष २०२० साठीच्या 'अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार (इंग्रजी, राज्यस्तर)' साठी निवड करण्यात आली आहे. तसेच नांदेडचे संदीप काळे यांना २०१९ चा राज्यस्तरीय बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार, नांदेडचेच सचिन मोहिते यांना २०२२ तोलाराम कुकरेजा उत्कृष्ट वृत्तपत्र छायाचित्रकार पुरस्कार, प्रविण टाके यांना शासकीय गटातून २०१९ सालचा यशवंतराव चव्हाण पुरस्कार व परभणीचे पंकज क्षीरगसार यांना पु.लं. देशपांडे दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

यासोबतच, पत्रकारितेतील दीर्घकालीन योगदानासाठी पाच ज्येष्ठ पत्रकारांना 'लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार' जाहीर झाले आहेत. यामध्ये २०१९ साठी राही भिडे, २०२० साठी सुधीर पाठक, २०२१ साठी भाऊ तोरसेकर, २०२२ साठी विजय बाविस्कर (दैनिक लोकमत) आणि २०२३ साठी बाळासाहेब जाधव (दैनिक पुढारी) यांचा समावेश आहे.

'लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार' हा पत्रकारितेतील दीर्घकालीन आणि उल्लेखनीय योगदानासाठी दिला जाणारा सर्वोच्च सन्मान आहे. तसेच, उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार वार्षिक आधारावर पत्रकारांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रदान केले जातात. अटल बिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कारासाठी १ लाख रोख आणि सन्मानचिन्ह, दिले जाते. आणि अनंत गोपाळ शेवडे पुरस्कारासाठी ५१ हजार रुपये रोख, मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र प्रदान केले जाते. या पुरस्कारांचे वितरण लवकरच एका औपचारिक सोहळ्यात होणार आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# भारतासाठी ऊर्जा सुरक्षेची कसोटी

इराणच्या संसदेकडून होर्मूझ सामुद्रधुनी बंद करण्याचा प्रस्ताव संमत झाल्याच्या पार्श्वभूमीवर जागतिक ऊर्जा बाजारात पुन्हा एकदा अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अमेरिकेच्या अणुउद्योगांवरील हल्ल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला असून, अंतिम निर्णय इराणच्या सुप्रीम नॅशनल सेक्युरिटी कौन्सिलकडे आहे. मात्र या संभाव्य बंदीचे परिणाम केवळ पर्शियन आखातापुरते मर्यादित राहाणार नाहीत, तर संपूर्ण जगासाठी विशेषतः भारतासारख्या तेलावर अवलंबून असलेल्या देशांसाठी ते गंभीर ठरू शकतात. होर्मूझ सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाची आणि संवेदनशील समुद्रमार्गांपैकी एक मानली जाते. ही अरबी समुद्र आणि पर्शियन आखात यांना जोडणारी केवळ ३० किमी रुंद अशी सामुद्रधुनी आहे. जगातील जवळपास २०% तेल आणि द्रवित नैसर्गिक वायू या मार्गाने दररोज वाहून नेले जाते. २०२४ मध्ये दररोज सरासरी २०.३ मिलियन बॅरल क्रूड ऑईल आणि २९० मिलियन घनमीटर एलएनजी या मार्गाने वाहतूक झाली होती. सौदी अरेबिया, इराण, इराक, संयुक्त अरब अमिरात आणि कुवेत यांसारख्या तेलसंपन्न देशांची निर्यात मुख्यत्वे याच मार्गावर अवलंबून आहे. विशेष म्हणजे या तेलाचा ८४% आणि एलएनजीचा ८३% हिस्सा आशियाई देश जसे भारत, चीन, जपान आणि दक्षिण कोरिया यांच्याकडे जातो. भारत आपली ९०% क्रूड ऑईल आणि ५०% नैसर्गिक वायूची गरज आयात करून भागवतो. यातील अंदाजे २ मिलियन बॅरल दररोज तेल केवळ होर्मूझ सामुद्रधुनी मार्गे भारतात पोहोचते. त्यामुळे या मार्गावरील कोणताही अडथळा हे भारतासाठी चिंता निर्माण करणारे ठरू शकते. तरीही, भारताने गेल्या काही वर्षांत आपली आयात धोरणे अधिक लवचिक बनवली आहेत. रशिया, अमेरिका, ब्राझील आणि पश्चिम आफ्रिकेतील देशांकडून पर्यायी तेल पुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे अर्धवट काळात आपत्तीचे प्रमाण कमी राहू शकते. मात्र जागतिक बाजारात अचानक मागणी-पुरवठा विसंगती निर्माण झाल्यास कच्च्या तेलाच्या किमती पुन्हा ८० डॉलर प्रति बॅरलपर्यंत जाण्याची शक्यता विश्लेषक व्यक्त करत आहेत. केंद्र सरकारकडून तेलसाठा पुरेसा असल्याचे आश्वासन देण्यात आले आहे. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी १३ जून रोजी स्पष्टपणे सांगितले की, भारताकडे पुढील काही महिन्यांसाठी पुरेशी इंधन उपलब्धता आहे. आणीबाणीच्या स्थितीत भारताकडे ९ ते १० दिवस पुरेल इतका स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्ह आहे. त्याचबरोबर गरज भासल्यास केंद्र सरकार सबसिडीचा पर्याय विचारात घेऊ शकते, जेणेकरून डिझेल व एलपीजी यांसारख्या अत्यावश्यक इंधनांचे दर नियंत्रित ठेवता येतील. पण या संभाव्य संकटाचा दीर्घकालीन आर्थिक परिणाम मात्र टाळता येणार नाही. देशांतर्गत इंधनदर स्थिर ठेवण्यासाठी भारतीय तेल कंपन्यांनी पूर्वीही मोठा आर्थिक तोटा सहन केला आहे. सरकारी कंपन्यांचे जसे इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम व हिंदुस्तान पेट्रोलियम नफा-तोट्याचे प्रमाण या घडामोडींवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहील. होर्मूझ सामुद्रधुनीतील अस्थिरता ही एकप्रकारे भारतासाठी इशारा आहे. दीर्घकालीन ऊर्जासुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी केवळ तेल आयातीवरील पर्याय शोधणे पुरेसे नाही, तर स्वच्छ आणि नवीकरणीय उर्जेच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करणे ही काळाची गरज आहे. शांतता आणि परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून भारताने पर्शियन आखातातील देशांशी असलेले संबंध अधिक दृढ करावे लागतील. कारण हा प्रश्न केवळ व्यापाराचा नाही, तर राष्ट्रीय सुरक्षिततेशी संबंधित आहे. जागतिक राजकारणाच्या या नव्या वळणावर भारतासारख्या उदयोन्मुख राष्ट्रांची कसोटी लागणार आहे ती केवळ रणनीतीची नाही, तर दृढ इच्छाशक्तीचीही.

# इराण-इजरायल युद्धात अमेरिकेची उडी; जगासमोर अनेक संकटं

आता सिद्ध झाले आहे की, अमेरिका जगाला तिसऱ्या महायुद्धाकडे नेताना दिसत आहे. कारण अमेरिका-इजरायल-इराण याची फक्त वर्चस्वाची लढाई आहे. परंतु यात मिडलिस्टमधील अनेक देश भरडले जात आहेत. आपण युक्रेन-रशिया, इजरायल सोबतचे हमास-हिज्बुल्ला-हुती विद्रोही-इराण यांचा संघर्ष व युद्ध पाहिले. परंतु आपण ज्याला सुपर पॉवर म्हणतो तो अमेरिका तडजोड न करता ऑपरेशन मिडनाईट हॅमरच्या माध्यमातून इराणवर अचानक अमेरिकेच्या बी-२ बॉम्बर विमानांनी इराणचे फॉर्डो उद्ध्वस्त करण्यासाठी बंकर बस्टर्ड बॉम्ब टाकतो आणि तेही १३६०० किलो वजनाचा एक बॉम्ब असे १४ बॉम्ब टाकून इराणचे फोर्डो, नातान्झ आणि इश्फाहान या ३ आण्विक केंद्रांवर हल्ले करून उद्ध्वस्त करतो याचाच अर्थ असा की, जग विनाशाकडे जात असल्याचे दिसून येते. यामुळे आता जगातील अनेक राष्ट्र दोन गटात विभागल्या जाण्याची दाट शक्यता आहे आणि त्याची सुरुवात सुध्दा झाली आहे.

अमेरिकेच्या कारवाईमुळे रशिया-चीन इराणकडून खुलेआम उतरू शकतो यालाही नाकारता येत नाही. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणने इस्त्रायलवर मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्रे डागण्यास सुरूवात केली आहे. अमेरिकेच्या इराणच्या अणुऊर्जा प्रकल्पांवर केलेल्या हल्ल्यामुळे जगात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अमेरिकेच्या बी-२ बॉम्बर हल्ल्यानंतर इराण होर्मुझचा जलमार्ग बंद करून नाकाबंदी करण्याची दाट शक्यता आहे. होर्मूझ खाडीतून जगातील २० टक्के कच्च्या तेलाचा व्यापार होतो आणि हा मार्ग इराणने बंद केला तर याचा परिणाम भारतासह जगातील अनेक देशांवर पडू शकतो. कारण अमेरिकेने थेट अणुकेंद्रांवर हल्ला केल्याने इराणच्या तळपायाची आग मस्तकात गेली आहे त्यामुळे इराणने अखेरचे हुकुमी अस्त्र बाहेर काढले आहे.

होर्मुझ बंद झाल्यास तेल पुरवठा-साखळी विस्कळीत होईल व जागतिक बाजारपेठेत तेलाच्या किमती भडकू शकतात. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खोमेनेई व परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी अमेरिकेला हल्ल्याचा परिणाम भोगण्यास सज्ज रहाण्याचा इशारा दिला. कारण अमेरिकेने आमच्या अणुकेंद्रावर हल्ले करून संपूर्ण सीमा ओलांडल्या आहेत त्यामुळे आम्हालाही आमचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे असा इशारा दिला. त्यामुळे या युध्दावर योग्य तोडगा निघाला नाही तर भयावह परिणाम होवू शकतात. कारण इराण-इस्त्रायल युध्द व युक्रेन-रशिया युद्ध सध्याच्या परिस्थितीत थांबणे शक्य नाही. परंतु अमेरिकेच्या इराणवरील हल्याने जगाला बेचैन केले असून तिसऱ्या महायुद्धाची घंटी वाजविल्याचे दिसून येते. डोनाल्ड ट्रम्पला वाटत असेल की, हा अमेरिका, इस्त्रायल आणि जगासाठी ऐतिहासिक क्षण आहे, परंतु ही बाब चुकीची आहे.कारण युद्धामुळे अजूनपर्यंत कोणालाच फायदा झालेला नाही उलट नुकसानच झाले आहे आणि आता अमेरिकेच्या



इराणवरील हल्ल्याने जगात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असून, याचे गंभीरपणे परिणाम जगातील संपूर्ण देशांना भोगावे लागतील. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाने पुढाकार घेऊन हे युध्द ताबडतोब थांबविले पाहिजे अन्यथा विनाश अटळ आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प जे बोलतात ते करीत नाही, आणि जे बोलत नाही ते करतात त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प हे विश्वास पात्र नेता रहाले नाही.अमेरिका सध्याच्या परिस्थितीत स्वार्थी व व्यापारी देश बनला आहे.अमेरिकेने स्वतःच्या स्वार्थासाठी दिनांक १४ जून २०२५ ला असीम मुनीरला अमेरिकि सशस्त्र दलाच्या २५० व्या वर्धापन दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते व सोबतच डोनाल्ड ट्रम्प यांचा ७९ वा वाढदिवस सुध्दा होता या निमित्ताने असीम मुनीर कडून इराणच्या अनेक महत्त्वपूर्ण ठिकाणांची व गुप्त माहिती अवगत केली.याचाही फायदा अमेरिकेने अवश्य घेतला असावा आणि असीम मुनीर पाकिस्तानला परत गेल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांना २०२६ चा नोबेल पुरस्कार देण्याची मागणी मिडियाच्या माध्यमातून केली आणि दुसऱ्याच दिवशी म्हणजे दिनांक २२ जून २०२५ ला अमेरिकेने इराणवर बी-२ बॉम्बर विमानांनी अणू केंद्रांवर हल्ला केला.यामुळे सध्याच्या परिस्थितीत पाकिस्तान अत्यंत कठीण परिस्थितीत फसल्याचे दिसून येते.कारण पाकिस्तानचे मित्र राष्ट्र चीन,इराण आणि वर्ल्ड बँकेकडुन कर्ज घेण्यासाठी अमेरिकेशी दोस्ती.त्यामुळे आता पाकिस्तान घर का ना घाट का अशी परिस्थिती झाली आहे.डोनाल्ड ट्रम्प ने स्पष्ट शब्दात सांगितले आहे की आम्ही दोस्ती कोणाही सोबत फुकट करीत नाही. त्यामुळे अमेरिकेला कल्पना होती की इराणचा खरा मित्र पाकिस्तान आहे त्यामुळे अमेरिकेने इराणविषयी संपूर्ण गुप्त माहिती पाकिस्तान कडून हस्तगत केल्याचे स्पष्ट दिसून येते.त्यामुळे इराणला खाईत लोटण्याचे केले असेल तर पाकिस्ताननेच केले आणि ही बाब इराणच्याही लक्षात आली आहे.त्यामुळे इराण व चीन पाकिस्तानला सुध्दा धडा शिकवु शकतो. या विनाशकारी महायुद्धाला संयुक्त राष्ट्रसंघाने,नाटो सह संपुर्ण देशांनी थांबवीण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे अन्यथा विनाश अटळ आहे.इराणने अमेरिकेसोबत बदला घेण्यासाठी कतर, बहरिन,इराक येथील अमेरिकेनं एअर बेस वर इराणने १० बेलेस्टीक मिसाईल डागली असुन अमेरिकन हल्ल्याचा बदला घेतल्याचा दावा इराणने केला आहे.परंतु इराणने डागलेले १० मिसाईल अमेरिकेने उध्वस्त केल्याचा दावा पेंटागॉन मधुन करण्यात आला आहे.यामुळे अमेरिकेन एअर बेसला कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही.युएई ने इराणच्या हल्ल्याची निंदा केली आहे.अमेरिका, रशिया, चीन, संयुक्त राष्ट्र यांनी एकत्र येऊन ताबडतोब युद्धविराम करावा.

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# शाळा म्हणजे समाजाची प्रतिकृती..!



आज शाळेचा पहिला दिवस. दरवर्षी शाळा १५ जूनला सुरू होतात. त्यामुळे शाळेत जाण्यासाठी मुले उत्सुक असतात. नवे वर्ग, नवे मित्र, मैत्रिणी, नवे पुस्तके, नवा गणवेश, नवीन बॅग, नवे शूज सर्व काही नवे नवे यामुळे मुलांच्या आनंदाला पारावर उरत नाही. प्रदीर्घ सुट्टी उपभोगून मुले आपापल्या विद्यालयात दाखल होतात. काही मित्र-मैत्रिणी आई-वडिलांच्या बदलीच्या निमित्ताने विद्यालय सोडून दुसरीकडे प्रवेश घेतात. त्यामुळे त्यांचा सहवास मिळत नाही

मनाला हुरहुर लागते. काही इतर कारणाने शाळेत विद्यार्थी येऊ शकत नाहीत. त्यामुळे मन उदासीन होते. सर्व सवंगडी एकत्रित येऊन केलेली शाळा वेगळीच असते. शाळेत संस्कार शिकविले जातात ते आयुष्यभर आपणाला बांधून ठेवतात. म्हणून शाळा ही संस्काराची विद्यापीठ असते. शाळेत अनेक जाती- धर्माचे मित्र मैत्रिणी मिळतात. त्यांना जात-पात सुद्धा कळत नसते, सर्वजण आपण एक आहोत ही भावना त्यांच्यामध्ये निर्माण होते ही किमया शाळेची असते. शाळा सर्वांना सारखा न्याय देते,म्हणून शाळेला विद्यामंदिर ही म्हणतात. प्रत्येक व्यक्ती शाळेतून शिकून मोठा होतो, अनेक वर्षे तो शाळेत गेलेला असतो, त्याला आज जरी मोठी नोकरी लागली तरी तो शाळा विसरत नाही.

गावापासून दूर नोकरीसाठी गेलेली व्यक्ती गावाची आठवण काढताना शाळेची विचारपूस हमखास करतात.शाळेने अनेकांना मोठे केले.भेदभाव काढून टाकले. अंगत पंगत करून जेवण दिले. खेळताना धमाल केली. वर्गातील शिस्तीमुळे अनेकांना आयुष्याची शिस्त लागली .संस्काराचे धडे मिळाले. छडी लागल्यामुळे विद्येचे महत्त्व कळाले. छडीमुळे आम्ही आज स्वतःच्या पायावर उभे राहिलो,शिक्षा झाली. म्हणून आम्ही आज अधिकारी आहोत. गुरुजींनी शिक्षा केली नसती तर आम्ही आज रिकामटेकडे राहिलो असतो, असे अनेक जण प्रांजळपणे चार-चौघांत सांगतात. हे सांगताना त्यांना थोडाही कमीपणा वाटत नाही, म्हणून गुरुजींनी शिस्त लावून शिक्षा केली हे त्याकाळी फार चांगले झाले.गुरुजींनी शिक्षा केले म्हणून घरातील लोकांना ही सांगता येत नसत, सांगितले तर घरी सुद्धा मार खाण्याची वेळ येत असे, म्हणून अभ्यास केल्याशिवाय पर्याय नव्हता, पाढे, पाठांतर करावे लागत होते. शब्दार्थ, सूत्र, पाठांतर करून वर्गात बसावे लागत होते, नाहीतर वेताची छडी असायची. टेबलावर हात ठेवून गुपचूप उभे राहावे लागत असे.शाळेचा पहिला दिवस आजही मला आठवतो, काही मुले रडत रडत येतात, पण शाळा शिकतात.ते दिवस कोणीही विसरू शकत नाहीत. प्रत्येक आईला आपला मुलगा शिक्षण शिकावा, मोठा व्हावा असे वाटत असते, म्हणून ती मुलांना शाळेत आणून सोडते, जे शाळेत मार खाऊन शिकले ते समाजाच्या प्रवाहात उतरले. जे शिकले नाहीत त्यांना शाळेची आठवण पुन्हा पुन्हा येते. केलेल्या चुका हमखास आठवतात इतरांकडे पाहून शाळेचे स्मरण होते. 'गेले ते दिवस, राहिल्या त्या आठवणी असे म्हणावे लागते.

ज्येष्ठ समाज सुधारक अण्णा हजारे म्हणतात मी घरी गृहपाठ केलो नव्हतो आणि शाळेत खोटे बोललो, वही घरी राहिली, असे गुरुजींना सांगितले. गुरुजी म्हणाले जा? घरी जाऊन गृहपाठाची वही घेऊन परत शाळेत ये, तेव्हा मी घरी गेलो,आईला खरे सांगितले. तेव्हा आई सुद्धा माझ्या सोबत शाळेत आली. त्यानंतर माझी कशीबशी सुटका झाली असे दिलखुलासपणे ते त्यांच्या आत्मचरित्रात लिहितात.शाळेने संस्कार व नीतिमत्ता शिकविले.

म्हणून शाळेचा पहिला दिवस मानवाच्या जीवनातील अविस्मरणीय क्षण असतो, तो मानवाला धर्म, तत्वे, नीती, न्याय, संस्कार सर्व काही शिकवते, शाळा पत्र्याची असो की, दगडांची असो त्या शाळेत शिकवणारे शिक्षक मुलांना संस्कार देतात. प्रत्येक शाळेत योग्य ज्ञान मिळते ते ज्ञान आपण कसे आत्मसात करतो, यावर बरेच काही अवलंबून आहे. शाळेला कोणीही दोष देऊ नये. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे हे शाळेत फक्त दोनच दिवस गेले आणि एवढे प्रचंड लोकसाहित्य लिहून काढले हे मुद्दाम येथे नमूद करावे वाटते. कारण शाळेनी त्यांना घडविले. त्यामुळे शाळा हे एक ज्ञानरूपी सरिता आहे.

७ नोव्हेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शाळेत गेले. तो त्यांचा पहिला दिवस होता, तो दिवस आज भारतभर विद्यार्थी दिवस म्हणून साजरा केला जात आहे.

म्हणून शाळेला ज्ञानाचे भांडार म्हणतात. तसेच शाळेला विद्यार्थ्यांचे दुसरे घर ही म्हणतात. शाळेत मित्र, मैत्रिणी, शिक्षक असतात. शाळा म्हणजे समाजाची प्रतिकृती होय. शाळेत मुलांचा भावनिक, बौद्धिक, मानसिक विकास होतो. कोमल बाल मनावर अनेक संस्कार विद्यालयात केले जातात. प्रत्येक मुलाची आवड वेगळी असते, त्यामुळे ते शिकतात गुरुवर्य रवींद्रनाथ टागोरांनी सर्व बालके एकत्रित करून शांतिनिकेतन ही शाळा सुरू केली म्हणून शाळेला एक संस्कार सरिता आपण म्हणूया! काळानुसार शिक्षण बदलत आहे म्हणून शाळेचा पहिला दिवस आज अतिशय आनंदाने घालूया! शाळेच्या पहिल्या दिवसाला खूप खूप शुभेच्छा.

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष: विठूमाऊली प्रतिष्ठान खैरकावाडी
ता.मुखेड जि.नांदेड

# पाऊले चालती पंढरीची वाट...

भक्त पंढरपूरच्या दिशेने पंढरीच्या वाटेवर चालत आहेत. ती वाट अध्यात्मिक आहे, ती भक्तीची वाट आहे, ती विठ्ठलाच्या दर्शनासाठी ची वाट आहे. जिथे हजारो वारकरी विठोबाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे चालत निघतात. त्यात भक्ती, समर्पण, एकता, आणि हरिपाठाचे महत्व दिसून येते. हजारो वारकरी विठोबाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे चालत निघतात ही परंपरा म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरेचं जिवंत रूप आहे. आषाढी एकादशीच्या आधी लाखो भाविक पालखीतून विशेषतः संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या पंढरपूरच्या विठ्ठल-रुखमाई मंदिरात पोहोचतात हे वारकरी टाळ-मृदुंगाच्या गजरात, भजन-गजर करत, ज्ञानोबा-तुकोबा म्हणत, साध्या पोशाखात, भक्तिभावाने पंढरपूरकडे प्रस्थान करतात. ही वारी फक्त धार्मिक यात्रा नाही, तर एक समाजजोडणारी, समतेचा संदेश देणारी, श्रम व भक्ती यांचा संगम करणारी चळवळ आहे.



वारी यात्रेचा महत्त्वाचा भाग म्हणजे हजारो वारकरी विठोबाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे चालत निघतात. शेतकरी मोठ्या प्रमाणावर असतात कष्टकरी महिला सगळ्यांचा सहभाग वारीत असतो वारकरी संप्रदायात लहान मोठा गरीब श्रीमंत पुरुष महिला हा भेदभाव नसतो एकमेकांना माऊली माऊली म्हणतात नमस्कार करतात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, सोपानकाका, संत जनाबाई, मुक्ताबाई, संत गोरा कुंभार या व्यतिरिक्त, वारकरी संप्रदायात अनेक थोर संतांनी योगदान दिले आहे. हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संत होते. ही यात्रा भक्तीपूर्ण भावना आणि परंपरेने भरलेली आहे, ज्यामध्ये भक्त आपले श्रद्धा आणि प्रेम विठ्ठलाला दर्शवतात. वारी ही महाराष्ट्राची एक प्रसिद्ध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे, जी भक्तांना एकत्र आणते. वारी मध्ये भक्त मंडळी पंढरपूरला येऊन विठ्ठलाची पूजा करतात आणि विविध धार्मिक विधी पार पाडतात. ही परंपरा महाराष्ट्रातील लोकांच्या श्रद्धा, भक्ती आणि सांस्कृतिक एकात्मतेचे प्रतीक आहे. वारीची यात्रा लाखो भाविक करत असतात, ज्यात ते एकत्र येऊन भक्तीगीत गात व पायी चालत पंढरपूरमध्ये दाखल होतात.

वारी यात्रेचा महत्त्वाचा भाग म्हणजे हजारो वारकरी दूरदूरून चालत येत पंढरपूरच्या विठोबाच्या दर्शनासाठी निघतात. ही यात्रा आषाढी एकादशीला पंढरपूर येथे पोहोचते. वारी ही श्रद्धा, भक्ती, आणि समर्पणाचं प्रतिक आहे. मुख्यतः ही वारी संत ज्ञानेश्वरांची आळंदीहून आणि संत तुकारामांची देहूहून पालखी घेऊन सुरू होते. पायी जातवेळस अनेक गावांत थांबे घेत, भजन, कीर्तन, अभंग गात वारकरी पुढे जातात. प्रत्येक टप्प्यावर त्यांची शिस्त, निष्ठा आणि सामूहिक भावना दिसून येते. ही परंपरा अनेक शतकांपासून अखंडपणे चालू आहे. ही यात्रा भक्तीभावनेने भरलेली असून, ती भक्तांच्या श्रद्धा, एकात्मता आणि संस्कृतीचे प्रतीक मानली जाते. वारकऱ्यांची ही यात्रा फक्त धार्मिक नाही, तर सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाची आहे.

भक्तीगीत गात, पायी चालत वारकरी पंढरपूरमध्ये दाखल होतात हे दृश्य अत्यंत भाविक आणि अध्यात्मिक असते. दरवर्षी आषाढी एकादशीच्या सुमारास महाराष्ट्रातील हजारो वारकरी आपल्या विठोबा भेटीच्या ओढीने वारी करत पंढरपूरला जातात. त्यांच्या ओठांवर अभंग, टाळ-मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा माऊली, तुकाराम महाराज की जय अशा जयघोषांनी वातावरण भक्तिमय होतं. पायी चालत, भजन करत, एकमेकांना मदत करत आणि मनामनात श्रद्धा बाळगून ही वारी एक अद्वितीय आध्यात्मिक यात्रा ठरते. हे दृश्य फक्त चालणं नाही, तर श्रद्धेचं, भक्तीचं आणि समर्पणाचं दर्शन असतं.

**-श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

# आपले आरोग्य आपली जबाबदारी!

राज्यात मौसमी पावसाला सुरुवात झाली असून पुढील काही आठवड्यात तो अधिक सक्रिय होईल. पाण्याचे अनेक स्त्रोत भरून काढण्यासाठी आणि खाद्यान्न निर्मिती करणाऱ्या कृषी क्षेत्राला मोसमी पावसावर अवलंबून राहावे लागते.म्हणून पावसाच्या आतुरते सोबतच त्याचे कौतुक सुद्धा होत असते. अर्थात पाणी हेच जीवन होय.पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत त्याचे संवर्धन, साठवणूक, जलस्रोत प्रदूषित न होणे याकडे गांभीर्याने बघितले जाते. पाणी हे जीवन रक्षक असले तरी पावसाळ्यात मात्र विविध आजार घेऊन तो दुहेरी भूमिका बजावत असतो.

दरवर्षी पावसाळ्यात दूषित जलजन्य आजारांत लक्षणीय वाढ आढळून येते. प्रामुख्याने कावीळ, गॅस्ट्रोएन्टेरिसीस, टायफाईड, कॉलरा, अतिसार, मलेरिया, डेंगू, चिकनगुनिया यांसारखे आजारांचे प्रमाण कमी अधिक प्रमाणात सर्वत्र बघायला मिळते. पोटदुखी, वारंवार शौचास जाणे, त्वचा आणि डोळे पिवळे पडणे. ताप, सर्दी, खोकला इ. आजारांची लक्षणे रुग्णांमध्ये आढळून येते तर काही आजार साथींचे असतात . कित्येक आठवडे साथींच्या आजारांची श्रृंखला खंडित करणे कठीण होऊन बसते. वयोवृद्ध, गरोदर स्त्रिया,बालके आणि नवजात शिशूंची अधिक काळजी घ्यावी लागते. काही आजार सामान्य वाटत असले तरी धोकादायक ठरतात.

सतत पडणाऱ्या पावसामुळे आपल्या मोकळ्या परिसरात पाणी साचून राहते; त्यामुळे कीटक व विषाणूंच्या प्रजननास मोठा वाव असतो. तसेच झाडं-झुडपे व उघड्यावर फेकलेला घाणकचऱ्यांमुळे माशा व डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणात वाढून मानवी आरोग्यासाठी संकट निर्माण करीत असतात. अशा आजारांवर स्वच्छता विषयक उपाययोजना केल्यास संभव्य साथींच्या आजारावर मात करता येते.पावसाळ्यात पिण्याचे पाण्याचे निर्जंतुकीरण, निवासस्थानाच्या परिसराची स्वच्छता आणि आरोग्याबाबत दक्षता हीच त्रिसूची पावसाळी आजारांपासून दूर ठेवण्यात साहाय्यभूत ठरते.

'आपले आरोग्य आपली जबाबदारी' हे धोरण अंगीकृत केल्यास पावसाळी आजारांपासून निश्चितच अलिप्त राहू! निरोगी आहार,ताज्या स्वच्छ भाज्या फळे खा. उघडे अन्न खाऊ नका. डासांपासून बचाव करा. हात पायांच्या स्वच्छतेबाबत दक्ष रहा. उकळलेले पाणी पिण्यास उत्तम. निरोगी आहार विहार, दुग्धजन्य पदार्थात बॅक्टेरिया असल्यामुळे ते टाळा.निरामय आरोग्यासाठी नियमितपणे व्यायाम करा. प्राणायाम करा नजीकच्या रुग्णालयात जाऊन प्रतिबंधक लसीकरण करा.यासारख्या वैद्यकीय दिशानिर्देशांचे पालनाची सवय लावली तर पावसाळी आरोग्य अबाधित राहील!

**-शशिकांत तोटे**
दारव्हा, जि. यवतमाळ
मो. ९१३०८३५४५८

## थोडक्यात...

### महाराष्ट्र योग शिक्षक संघातर्फे योग दिन साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र योग शिक्षक संघ व योग विद्या धाम, एमजीएम महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतीक योग दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त योग वर्ग योग शिक्षक आनंद देशमुख, योग शिक्षक तुमोड, मयुरी कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष अर्जुन शिंदे यांनी योगाचे प्रात्यक्षिक करून घेतले.

योगा हा जीवनात किती महत्वाचा आहे याबद्दल यावेळी सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच राजर्षि शाहू हायस्कूल, वसंत नगर, प्रिय दर्शनी शाळा येथे सौ. संगीता योगेश वडजे यांनी योग वर्ग घेतला. यावेळी प्रात्यक्षिक करून दाखवून विद्यार्थ्याकडून करून घेण्यात आले. डॉ. मनोज निलपवार यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यातील शाखेत २१ जून जागतिक योग दिवसा निमित्ताने योग वर्ग घेण्यात आले.

### प्रा. गोईनवाड, वाघमारे, खानसोळे यांना पुरस्कार

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने दिला जाणारा छत्रपती राजश्री शाहू महाराज भूषण समाज भूषण पुरस्कार नांदेड जिल्हा परिषदेचे कर्मचारी जयप्रकाश वाघमारे, गडगा (ता. नायगाव) येथील प्रा. ब. ना, गोईनवाड, सेफ एक्सप्रेस प्रा.लि.चे दत्ता पाटील खानसोळे यांना जाहीर झाला आहे. पँथर नेते रमेश भाई खंडागळे यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि.२६ जून) दुपारी १२ वाजता रूबी हॉटेल येथे हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी भीम कायदा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विलास गजभारे, संस्थापक बा. रा. वाघमारे, क्रीडा विभागाचे बालाजी शिरशीकर यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे.

# मनपा आयुक्तांना जन्मदिनी ५ हजार वृक्षबिजांची भेट

## महापालिकेतील स्टेडियम व्यवस्थापक रमेश चवरे यांचा अभिनव उपक्रम



**नांदेड (प्रतिनिधी)**– एखाद्या प्रशासकीय अधिकाऱ्याचा वाढदिवस असला की त्यांना भेटवस्तू देण्यासाठी सर्व स्तरातील मान्यवर उत्साहीत असतात. परंतु महापालिकेत आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या वाढदिवसा निमित्त त्यांना चक्क ५००० वृक्षबीजे भेट देऊन एक आगळा-वेगळा प्रयोग महापालिकेच्या एका विभाग प्रमुखाने केला आहे.

दि. २१ जून रोजी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांचा वाढदिवस होता. सार्वजनिक सुट्टीचा दिवस असल्याने मनपा आयुक्तांची कार्यालयामध्ये भेट होऊ शकणार नसल्याने नांदेड शहरातील मान्यवर व्यक्ती तसेच महापालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा देण्यासाठी मनपा आयुक्तांच्या घरीच रांग लावलेली होती. आयुक्तांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यासाठी मान्यवरांनी आप-आपल्या परीने शॉल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मिठाई, पुस्तक अशा विविध प्रकारच्या भेटवस्तू देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. परंतु महापालिकेतील स्टेडियम व्यवस्थापक रमेश चवरे यांनी मागील वर्षभरापासून जोपासलेली एकूण पाच हजार वृक्षबीजे यावेळी आयुक्तांना भेट दिली आहेत.

मनपा आयुक्तांच्या संकल्पनेतून नांदेड शहरात हरित नांदेड शहर या उपक्रमांतर्गत विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात येत आहे. याच अभियानाचा भाग म्हणून महापालिकेतील अधिकाऱ्यांना सुद्धा आयुक्तांनी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरवून देऊन प्रत्येक विभाग प्रमुखाने जास्तीत, जास्त वृक्षारोपण करण्यासाठी आदेशित केलेले आहे. याच उपक्रमातून प्रेरणा घेऊन स्टेडियम व्यवस्थापक रमेश चवरे यांनी मागील वर्षभरात विविध ठिकाणाहुन कडुलिंबाची एकूण ५००० वृक्षबीजे एकत्रितपणे स्टेडियम परिसरात लावली. त्यांचे संगोपन करून वाढीस घातलेली होती.

वृक्षबीज किंवा रोपे वाढदिवसाची एक अनोखी आणि पर्यावरणपूरक भेट असू शकेल तसेच यामुळे पर्यावरणाची काळजी घेतली जाईल आणि ज्याला भेट दिली आहे, त्याला एक छान आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होईल या विचारानेच आपण ही ५००० वृक्षबीजे मनपा आयुक्तांना वाढदिवसानिमित्त भेट दिली असल्याचे चवरे यांनी सांगितले.

यावेळी मनपा आयुक्तांनी या पर्यावरण पूरक भेटीचा स्वीकार करताना झाडे जीवनाचे, वाढीचे आणि निसर्गाचे प्रतीक आहेत, ज्यामुळे सकारात्मकता आणि आनंद मिळतो. रोपे किंवा वृक्षबीजे दीर्घकाळ टिकणारी भेट आहे, जी वेळोवेळी आठवण करून देतात असे सांगताना या आगळ्या-वेगळ्या भेटीसाठी आभार व्यक्त केले.

वृक्षारोपण ही काळाची गरज असून नागरिकांनी आपल्या परिसराच्या पर्यावरणाची काळजी घेणे ही आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. वाढत्या प्रदूषणामुळे आणि नैसर्गिक संसाधनांच्या ऱ्हासामुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असून. यावर मात करण्यासाठी, वृक्षारोपण हा एक उत्तम उपाय आहे. वृक्ष आपल्याला फळे, फुले, सावली आणि शुद्ध हवा देतात. ते हवामानातील बदल कमी करण्यास मदत करतात. आपले आरोग्य आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी वृक्ष आवश्यक आहेत. त्यामुळे प्रत्येक नागरिकांनी किमान एक झाड लावून वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये सहभाग घेण्याचे आवाहन यावेळी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले आहे.

# ऑलिंपिक मशाल रॅलीला प्रतिसाद; 'भारत माता की जय' घोषणेने परिसर दुमदुमला



**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा क्रीडा कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महापालिका व ऑलम्पिक असोसिएशन नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी ऑलम्पिक मशाल रॅली काढण्यात आली. याप्रसंगी क्रीडा प्रशिक्षक, खेळाडू मोठ्या प्रमाणात या मशाल रॅलीस सहभागी झाले होते.

जुना मोंढा येथे सकाळी ८ वाजता संत बाबा बलविंदर सिंघजी यांच्या हस्ते ओलंपिक मशाल रॅली पेटवून हिरवी झेंडी दाखवण्यात आली. यावेळी नांदेड ऑलम्पिक संघटनेचे चेअरमन जनार्दन गोपीले, कार्याध्यक्ष प्रलोभ कुलकर्णी, ज्येष्ठ क्रीडा संघटक डॉ. हंसराज वैद्य, डॉ. दीपक बच्चेवार, अध्यक्ष जसविंदरसिंघ रामगडिया, सचिव डॉ. राहुल वाघमारे, क्रीडा अधिकारी बालाजी शिरशीकर,संजय बेतेवार, उपाध्यक्ष बालाजी जोगदंड, डॉ.रमेश नांदेडकर, विक्रम खेडकर, विनोद गोस्वामी, आर. टी. रमणबैनावाड, बी. एम. कलमसे, कोषाध्यक्ष जयपाल रेड्डी, सहसचिव विनोद जमदाडे, वृषाली पाटील जोगदंड, कुलदीप सिंग जट, डॉ. राजेश जांभळे, सदस्य बाबुराव खंदारे, बंटी सोनसळे, राष्ट्रपाल नरवाडे यांच्या समवेत विविध क्रीडा संघटना पदाधिकारी उपस्थित होते.

नांदेड शहरातील जुना मोंढा, महावीर चौक, हनुमान पेठ, पोलीस अधीक्षक कार्यालय, कला मंदिर, शिवाजीनगर महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले पुतळा ते जिल्हा क्रीडा कार्यालय यादरम्यान ही ऑलिंपिक मशाल रॅली काढण्यात आली होती. अतिशय शिस्त विविध रंगाची ध्वज समोर तिरंगा ध्वज त्या पाठीमागे ऑलिम्पिक मशाल रॅली असा क्रम यावेळी संयोजकांनी ठेवला होता.

या रॅलीची सांगता जिल्हा क्रीडा कार्यालय नांदेड या ठिकाणी करण्यात आली. या मशाल रॅली यशस्वीतेसाठी विविध क्रीडा संघटना ऑलम्पिक असोसिएशन नांदेड यांनी पुढाकार घेतला होता. डॉ. राहुल वाघमारे यांनी प्रास्ताविक तर संचलन प्रलोभ कुलकर्णी यांनी केले. विनोद जमदाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# शेतकऱ्यांना त्वरित कर्ज वाटप करा अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करू –संतोष कल्याणकर



**अर्धापूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील शेतकऱ्यांना बँकांनी त्वरित पीक कर्ज वाटप करावे तसेच सिविलच्या अडचणी मुळे शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँकांनी शेतकऱ्यांना कोणतेच कारण न देता कर्ज वाटप करावे अन्यथा शिवसेना स्टाईलने हिसका दाखवू असा इशारा निवेदनाद्वारे शिवसेना तालुकाप्रमुख संतोष कल्याणकर यांनी दि.२३ सोमवारी रोजी एसबीआय बॅक शाखा व्यवस्थापकांना दिला आहे.

तालुक्यातील केळी उत्पादक शेतकरी वादळी वाऱ्यामुळे व पावसामुळे केळी पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे. आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना पेरणीसाठी बँकांनी पीक कर्ज वाटप करावे यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या सूचनेवरून शिवसेनेचे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात, जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील सर्व बँकांच्या शाखा व्यवस्थापकांना शिवसेना तालुकाप्रमुख संतोष कल्याणकर यांनी निवेदनाद्वारे मागणी केली की आपल्या बँकेत कर्ज मागणीसाठी आलेल्या सर्व शेतकऱ्यांना कोणतीही आठ न घालता पिक कर्जवाटप करावे तसेच बँकांनी किती शेतकऱ्याला कर्जवाटप केले याची माहिती द्यावी व किती शेतकऱ्यांना कर्ज वाटप केले नाही याची यादी द्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.यावेळी विभाग प्रमुख एकनाथ मोगरकर,शाखाप्रम

# पुजा हेल्थकेअरच्यावतीने सासवड येथील शिबिरात ५ हजार वारकऱ्यांच्या गुडघेदु:खी, कंबरदु:खीवर मोफत उपचार



**नांदेड (प्रतिनिधी)**– दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी सिडको येथील पुजा हेल्थकेअर सेंटरच्यावतीने आळंदी ते पंढरपूर पायी चालणाऱ्या वारकयांसाठी मोफत उपचार शिबीर घेतले. या शिबिरात पाच हजारांवर वारकऱ्यांच्या गुडघे दुःखी, कंबर दुःखी आणि इतर होणाऱ्या त्रासावर मोफत उपचार केले.

संचालक डॉ. अवधूत पवार, सुजोक व निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ. संभाजी पवार आणि मित्रमंडळाच्यावतीने अकुप्रेसर, सुजोक, कायरो, म साज या पद्धतीने सासवड पुणे येथे उपचार करण्यात आले.

आळंदी ते पंढरपूर दरम्यान, हडपसर ते सासवड मार्गावर दिवे घाट सर्वात मोठा जवळपास ३२ किलोमीटरचा सर्वात मोठा टप्पा असतो. हा टप्पा पूर्ण करून आलेल्या भाविकांवर हे मोफत उपचार करण्यात आले.सामाजिक बांधिलकी आणि आपले कर्तव्य समजून दर वर्षी डॉ. अवधूत पवार आणि त्यांचे चिरंजीव डॉ. संभाजी पवार आणि बाळासाहेब पवार त्यांच्या टीम सह गेल्या पाच वर्षांपासून मोफत उपचार सेवा करत आहेत. या वर्षी सुद्धा डॉ. अवधूत पवार आणि डॉ. संभाजी पवार स. नरेंद्र सिंघ ग्रंथी, बाळासाहेब पवार, ऋषिकेश पांचाळ, अलकेश भोशीकर, अशोक जाधव, अरविंद जाधव, उद्धव जाधव, उद्धव काकडे, कुणाल लोखंडे सोबत सासवड येथे २२ व २३ जून रोजी पाच हजार रुग्णांवर मोफत उपचार करून सेवा करण्यात आली. यावेळी केक्स्टोरीचे संतोष चौखंडे यांचे सहकार्य लाभले.




**नांदेड** : येथील नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या गणित व संख्याशास्त्र विभागातील गौरव वानखेडे याची आयआयटी गुवाहाटी येथे निवड झाल्याबद्दल अभिनव भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब पांडे, प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार कुलकर्णी, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. मनीष देशपांडे, संख्याशास्त्र विभागप्रमुख डॉ. किशोर इंगळे तसेच गणित विभागप्रमुख डॉ. आशा मेश्राम यांनी त्याचा सत्कार केला.

# उत्पादन वाढीसाठी पेरणीपूर्व बिजप्रक्रिया महत्त्वाची –शिवाजी मिरासे

**उमरी (प्रतिनिधी)**– पिकांच्या दर्जेदार उत्पादनासाठी वाण निवड, सुयोग्य जमिनीची निवड, सिंचन- खत व्यवस्थापन, पीक संरक्षण आदी बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. यासोबतच लागवडीपूर्वी बियाणास शिफारशीत घटकांची बीजप्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक आहे, असा सल्ला तालुका कृषी अधिकारी शिवाजी मिरासे यांनी दिला आहे.

जमिनीतून तसेच बियाण्याद्वारे पसरणाऱ्या कीड-रोगांपासून संरक्षण होण्यासाठी पेरणीपूर्वी बियाणास जैविक व रासायनिक घटकांची बीजप्रक्रिया महत्त्वाची आहे. बीजप्रक्रियेमुळे बियाणांभोवती जैविक व रासायनिक बुरशीनाशकांचे सुरक्षित कवच तयार होते. त्यामुळे रोपांचे रोगांपासून संरक्षण होण्यास



मदत होते, असे ते म्हणाले.

बहुतांश कीड-रोगांच्या अवस्था या जमिनीमध्ये सुप्तावस्थेत असतात. पोषक वातावरण मिळताच त्यांचा पिकावर प्रादुर्भाव दिसून येतो. पिकांवर येणाऱ्या रोगांना कारणीभूत असलेल्या बऱ्याच सूक्ष्मजीवांचा प्रसार जमिनीतून व बियाणांद्वारे होत असतो. हाच प्रादुर्भाव कमी करून पिकांची सशक्त व जोमदार वाढ होण्यासाठी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे. त्यामुळे पीक उगवणीच्या तसेच वाढीच्या प्राथमिक अवस्थेत होणारा कीड-रोगांच्या प्रादुर्भाव अटकाव करण्यास मदत मिळते. तसेच बिजप्रकियेमुळे बियाण्याची उगवण क्षमता वाढते, रोपांची सतेज व जोमदार वाढ होते, रासायनिक खतांची २० ते २५ टक्के बचत होते, जमिनीतून व बियाण्यांद्वारे पसरणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव टाळता येतो, पीक उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ मिळते. त्यामुळे पेरणीपूर्व बीज प्रक्रिया करूनच पेरणी करण्याचे आवाहन उमरी तालुका कृषी अधिकारी शिवाजी मिरासे यांनी आहे.

# फळपिक विमा कंपनीकडे झालेल्या नुकसानीची तक्रार नोंदविण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– अर्धापूर तालुक्यात ९ जून रोजी झालेल्या वादळवारा व पावसामुळे फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या तालुक्यातील शेतकऱ्यांनी फळपिक विमा कंपनीकडे नुकसानीची तक्रार नोंदवावी, असे आवाहन तालुका कृषि अधिकाऱ्यांनी केले आहे.

अर्धापूर तालुक्यातील फळपीक नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना पुर्व सूचना देण्यात आली आहे. आपण रब्बी हंगामातील फळपिक विमा भरला असेल व आपल्या केळी पपई, आंबा-आंबिया बहार या पिकांचे नुकसान वादळी वाऱ्याने झाले असल्यास wind speed वरील पर्याय निवडून पिक विमा कंपनीस पूर्व सूचना द्यावयाचे आहे.

पूर्व सूचना दिल्याशिवाय स्थानिक नैसर्गिक आपत्ती या घटकाअंतर्गत विमा मिळत नाही. आपण आपल्या पिकाच्या नुकसानीची पूर्व सूचना १४४४७ या टोल फ्री क्रमांकारवर फोन करून किंवा क्रॉप इन्सुरन्स ॲपद्वारे द्यावी. पिक नुकसानीची पूर्व सूचना ही पिकांचे नुकसान झाल्यापासून ७२ तासांच्या म्हणजेच तीन दिवसांच्या आत देणे गरजेचे आहे.

पूर्व सुचना दिल्यानंतर उपलब्ध झालेला docket Id फळपिक विमा योजनेचा लाभ मिळणे सोयीचे होण्यासाठी सांभाळून ठेवावा, असेही आवाहन तालुका कृषि अधिकारी अर्धापूर यांनी केले आहे.

# समता दिंडीचे उद्या आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– सामाजिक न्याय दिन अर्थात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिनानिमित्त २६ जून २०२५ रोजी सकाळी ८ वाजता समता दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या समता दिंडीमध्ये जिल्ह्यातील महाविद्यालय व शाळेतील विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयामार्फत सामाजिक न्याय दिवस साजरा करण्यात येतो. यानिमित्त समता दि. २६ जून रोजी दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन समता दिंडीची सुरवात होईल. या समता दिंडीचा मार्ग महात्मा ज्योतिबा फुले पुतळा, स्नेहनगर ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुतळा असा असून, राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुतळा येथे दिंडीचा समारोप होईल.

# प्रा. इर्शाद अहमदखान यांच्या तीन ग्रंथांचे प्रकाशन




**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातील उर्दू विभागप्रमुख प्रा. डॉ. ईशाद अहमदखान यांच्या 'असनाफ -ए- उर्दू अदब,' 'निगारी शात-ए- उर्दू अदब भाग -३ व भाग-४' या तीन संदर्भ ग्रंथांचे प्रा. डॉ. मजीद बेदार, माजी उर्दू विभाग प्रमुख उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. सय्यद सुजात अली, प्राचार्य एच. जे. थीम कॉलेज जळगाव, प्रा. डॉ. सज्जाद अहमद खान, डॉ. काझी नवीद अहमद सिद्दीकी, उर्दू विभाग प्रमुख आझाद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर, डॉ. मोहम्मद अनवरउद्दीन, उर्दू विभागप्रमुख शासकीय महिला महाविद्यालय हैदराबाद, तसेच प्रा. डॉ. सय्यद नुरूल अमीन, उर्दू विभाग, शारदा महाविद्यालय परभणी उपस्थित होते.

या प्रसंगी प्राचार्य प्रा. डॉ. एम. वाय. कुलकर्णी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. ते म्हणाले की, उर्दू विषयातील एक अभ्यासू व तज्ञ प्राध्यापक म्हणून प्रा. डॉ. ईशाद अहमद खान ओळखले जातात. त्याचबरोबर त्यांची एकूण उर्दू विषयातील संदर्भ ग्रंथ म्हणून दहा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांनी नेहमीच विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून अतिशय सोप्या भाषेमध्ये उर्दूचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता पुस्तक उपलब्ध करून दिली आहेत.

या पुस्तकांची सेट-नेट व स्पर्धात्मक परीक्षांकरिता उपयोगितेविषयी माहिती देण्यात आली. प्रा. डॉ. सय्यद नुरूल अमीन यांनी सूत्रसंचालन केले. इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. जीवन मसुरे यांनी आभार मानले. या सोहळ्याला प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व उर्दू विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी पेरणीसाठी घाई करू नये –डॉ.ऐतवडे

**नांदेड (प्रतिनिधी)**– कृषी विभागामार्फत यापूर्वीच शेतकऱ्यांना १०० मिमी पेक्षा अधिक समाधानकारक पाऊस होईपर्यंत पेरणी टाळावी, असे आवाहन करण्यात आले होते. परंतु, काही तालुक्यांत शेतकऱ्यांनी आधीच पेरणी सुरू केल्यामुळे बियाणे उगवणीसंदर्भात तक्रारी प्राप्त होत आहेत. सध्या पावसाचा खंड मोठ्या प्रमाणात राहिल्यास, पेरलेले बियाणे उगवण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांची पेरणी अद्याप शिल्लक आहे, त्यांनी घाई न करता प्रतीक्षा करावी, असे आवाहन जिल्हा कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे यांनी केले आहे. सर्व तालुक्यांमध्ये सरासरी ६९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. एकूणच एकाही तालुक्यात १०० मिमी पावसाची नोंद झालेली नाही.

# सावरगाव (न.) येथील मुलाच्या आत्महत्येनंतर वडिलांचा मृत्यू; आमदार चिखलीकरांनी केले कुटुंबियांचे सांत्वन

**लोहा (प्रतिनिधी)**– दहा दिवसांपूर्वी तालुक्यातील नसरत सावरगाव येथे नापिकी व कर्ज बाजारीपणाला कंटाळून शेतकरी माधव बेंद्रे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यानंतर त्याच्या वडिलांचा हृदयविकाराच्या आजाराने मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेनंतर आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी बेंद्रे कुटुंबियांच्या घरी भेट दिली आणि कुटुंबीयांचे सांत्वन करून धीर दिला.



तालुक्यातील नसरत सावरगाव येथील पिता पुत्राच्या मृत्यूची हृदयद्रावक घटना घडली. त्यातच आई सुद्धा रुग्णालयात उपचार घेत होती. बेंद्रे कुटुंबावर मोठे संकट उभे राहिले. पिता पुत्राच्या निधनानंतर श्रीमती शोभाबाई भिमराव बेंद्रे यांची आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी भेट घेतली. त्यांना धीर दिला त्याच्या कुटुंबाला सर्वोत्तरी मदत करायचे आश्वासित केले.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धमधिकारी, प्रदेश सरचिटणीस, प्रवीण पाटील चिखलीकर, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, माजी उपनगराध्यक्ष दता वाले, माजी नगराध्यक्ष स्वप्निल पाटील लुंगारे, माजी उपसभापती बालाजी पाटील कदम, भारत पाटील कदम, सरपंच संपती भावे, उपसरपंच पाडूरंग पाटील देवकते, नायब तहसीलदार अशोक मोकले, विस्तार अधिकारी धनंजय देशपांडे, भगवान राठोड, विस्तार अधिकारी म्हेत्रे, ग्रामसेवक संभाजी हळदेवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक गुडपे, तलाठी भूमेश्वर विभुते, बेंद्रे, कारामंगे, बंडू वडजे, अविनाश पाटील सुर्यवंशी, भास्कर पवार, बाळू पवार, भानुदास पाटील यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# हार्ट अटॅक येण्याआधी कानात सांगतो..!

**हृदयाशी निगडीत आजारांचा धोका झपाट्याने वाढत आहे आणि यामध्ये हृदयविकाराचा झटका म्हणजेच हार्ट अटॅक खूप सामान्य झाला आहे. सामान्य लक्षणांमध्ये श्वास लागणे, छातीत दाब पडल्यासारखं वाटणं किंवा प्रचंड ताण येणं किंवा घाम येणं ही हार्ट अटॅकची सामान्य लक्षणे आहेत. पण याची काही विचित्र लक्षणे कानांमध्ये देखील दिसू शकतात.**

हृदयविकाराच्या झटक्यामुळे छातीच्या मध्यभागी किंवा डाव्या बाजूला मोठा तणाव किंवा कळ जाणवते जी काही मिनिटांपेक्षा जास्त काळ टिकते किंवा ती निघून जाते आणि परत येते. या बैचेनी किंवा अस्वस्थपणामुळे तुम्हाला दबाव, जडपणा किंवा वेदना जाणवू शकतात. तुम्हाला अशक्तपणा, डोके दुखणे किंवा चक्कर आल्यासारखे वाटू शकते. हृदयविकाराच्या झटक्याची लक्षणे पुरुष आणि स्त्रियांमध्ये वेगवेगळी असू शकतात. पुरुषांमध्ये सर्वात सामान्य लक्षण म्हणजे छातीत दुखणे किंवा अस्वस्थता, परंतु स्त्रियांमध्ये इतर सामान्य लक्षणे आहेत. बरं, हृदयविकाराची काही लक्षणे अशी देखील आहेत जी कानामध्ये दिसू शकतात.



- कानात दिसतात लक्षणे : हृदयविकाराच्या झटक्याचे एक विचित्र लक्षण तुमच्या कानात जाणवू शकते, ज्याला फ्रँक्स साइन (Frank's sign) म्हणतात. हे कानाच्या लोबमधील एक क्रीज आहे, जे लोब्यूलच्या पलीकडे ट्रॅगसपासून ऑरिकलच्या मागील काठापर्यंत पसरते. याचे नाव सँडर्स टी या फ्रेंक यांच्या नावावरून ठेवण्यात आले. हो तो व्यक्ती आहे जो छातीत दुखणे आणि कोरोनरी आर्टरी ब्लॉकेज असलेल्या रुग्णांमध्ये क्रिझचं निरीक्षण करणारा पहिला व्यक्ती होता. हे कार्डियाक पॅथॉलॉजीशी आणि कोरोनरी आर्टरी एथेरोस्क्लेरोसिसशी संबंधित असल्याचे मानले जाते.
- स्टडीतून नेमकं काय आलं समोर? : ज्या लोकांच्या कानावर केस आहेत त्यांना हृदयविकाराचा झटका येतो. विशेषतः अशा लोकांना कधीही हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. संशोधनानुसार, तुमचे कान आणि हृदयविकारांचा घनिष्ठ संबंध आहे. १९७३ साली डॉ. सँडर्स टी. फ्रँक आणि त्यांच्या टीमला असे आढळून आले की ज्या लोकांच्या कानावर जास्त केस आहेत त्यांना हृदयविकाराची समस्या अधिक आढळून आली. आजच्या काळात कानावर केस येण्याची समस्या जेनेटिकपेक्षा धावपळीच्या जीवनामुळे जास्त आहे. मात्र ही समस्या सर्वाधिक सिगारेट ओढणाऱ्या लोकांमध्ये दिसून येत आहे. तुमच्या कानावर केस असतील तर ही साधी गोष्ट म्हणून दुर्लक्ष करू नका.



- या गोष्टींमुळेही वाढतो धोका : तंबाखूचे सेवन, मद्यपान, बैठी जीवनशैली, ताणतणाव, उलट-सुलट गोष्टींचे सेवन आदींमुळेही हृदयविकाराचा धोका वाढू शकतो.
- हार्ट अटॅकपासून बचावाचे मार्ग : हृदयविकाराचा धोका टाळण्याचा किंवा कमी करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे निरोगी जीवनशैलीचा अवलंब करणे. हलके आणि स्वच्छ जेवण खाणे, नियमित व्यायाम करणे, स्ट्रेस कमी घेणे आणि संपूर्ण शरीराचे आरोग्य सांभाळल्याने हृदयविकाराचा धोका कमी होण्याची शक्यता वाढते.


## हार्ट अटॅकची इतर कारणे

मेयो क्लिनिकच्या मते, ४५ वर्षे व त्याहून अधिक वयाचे पुरुष आणि ५५ वर्षे व त्याहून अधिक वयाच्या महिलांना हृदयविकाराचा धोका तरुण पुरुष आणि स्त्रियांपेक्षा जास्त असतो. याशिवाय उच्च रक्तदाब (high blood pressure), कोलेस्टेरॉल (cholesterol), लठ्ठपणा (weight gain), मधुमेह (diabetes) आणि मेटाबॉलिक सिंड्रोम (metabolic syndrome) यासारख्या परिस्थिती असलेल्या लोकांना हृदयविकाराचा धोका जास्त असतो.

## हार्ट अटॅक आल्यावर काय करावं?

तुम्ही कार्डिओपल्मोनरी रिसुसिटेशन (CPR) चा अवलंब करू शकता. हृदयविकाराचा झटका किंवा हृदयविकाराच्या झटक्याने पीडित व्यक्तीसाठी तातडीने करता येईल अशी सीपीआर ही आपत्कालीन प्रक्रिया आहे. ज्याच १२० च्या स्पीडने रुग्णाच्या हृदयावर प्रेशर दिले जाते. ही प्रक्रिया रक्तप्रवाह सक्रिय ठेवण्यास, हृदयाला ब्लड पंप करण्यास, हृदयाची गती कमी असलेल्या व्यक्तीमधील श्वासोच्छवास आणि हृदयाचे ठोके पूर्ववत करण्यास मदत करते.





# वारंवार पोट खराब का होतं?

**पावसाळ्याचे आगमन होताच अनेक गंभीर आजारांचा धोका वाढतो. कीडे- कीटक चावण्यापासून ते ॲलर्जी, ताप आणि संसर्गाची प्रकरणे वाढू लागतात. या ऋतूत तुमच्या पचनावर सर्वाधिक परिणाम होतो. वास्तविक, पाण्यातील आणि वातावरणातील ओलाव्यामुळे बॅक्टेरिया फंगस-व्हायरससाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करतात. त्यामुळे थोडीशी घाण आणि जेवणातील छोटीशी चूकही तुमचे पोट खराब करण्याचे काम करू शकते.**

अपचनाला पोट खराब होणे असेही म्हणतात. यात पोटदुखी, पोटात गॅस, पोटात मुरड किंवा पिळ बसणे, जुलाब, बद्धकोष्ठता आणि उलट्या यांचा समावेश होतो. हे खूप फास्ट खाणे किंवा काही विशिष्ट पदार्थांमुळे, जास्त अल्कोहोल किंवा कॅफिनचे सेवन करणे किंवा तणावामुळे होऊ शकते. सामान्यतः ज्या व्यक्तीचे पोट खराब असते त्याला खाण्यात अडचण येऊ शकते किंवा काहीच खावसं वाटत नाही. अशा परिस्थितीत शरीरातील पाण्याची कमतरता टाळण्यासाठी रुग्णाने भरपूर द्रव पदार्थ प्यावेत. त्यामुळे पोटाला आणखी त्रास न देता भूकही भागवता येते. यासोबतच आम्ही तुमच्यासोबत अशा काही पदार्थांविषयी माहिती शेअर करत आहोत जे पोटाशी संबंधित अशा आजारांपासून दूर राहण्यासाठी किंवा ते झाल्यावर लवकर बरे होण्यासाठी मदत करू शकतात.

- केळी : केळी पचनाशी संबंधित आजारांच्या लक्षणांपासून मुक्त होण्यास मदत करू शकतात. कच्च्या केळीमध्येही पेक्टिन भरपूर प्रमाणात असते. हा एक प्रकारचा घुलनशील फायबर आहे जो जुलाबांशी लढण्यास मदत करतो. हे खराब पोट शांत करण्याचे काम करते. हे शरीरातील इलेक्ट्रोलाइट जे अनेकदा उलट्या आणि जुलाब होत असताना कमी झालेले, ते संतुलित राखण्यास देखील मदत करते. त्यामुळे, जर तुमचे पोट खराब झाले असेल तर औषधं खाण्याऐवजी कच्च्या केळीचे काही तुकडे थोडेसे मध किंवा आले लावून खाण्याचा प्रयत्न करा.
- हळद : पावसाळ्यात दूषित अन्नपदार्थ आणि पाण्यामुळे पोट खराब होण्याचा धोका वाढतो. अशावेळी हळदीचे सेवन केल्याने पोट खराब होण्याची लक्षणे कमी होतात आणि अस्वस्थता दूर होते. पोटदुखीवर नैसर्गिक उपाय म्हणून हळद फार पूर्वीपासून वापरली जात आहे. हळदीला त्यातील कर्क्यूमिनमधील सक्रिय घटक, अँटी-इन्फ्लमेट्री आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्मांसाठी ओळखले जाते. सप्लिमेंट्स, चहा किंवा अन्नपदार्थ या माध्यमातून हळदीचा अनेक प्रकारे वापर केला जाऊ शकतो.
- आले : आले गॅस्ट्रोइंटेस्टाइनल डिसऑर्डर सुधारण्यास मदत करू शकते. पोट फ्लू किंवा फूड पॉयझनिंगमध्ये आले खाण्याचा सल्ला डॉक्टरदेखील देतात. तुम्ही आल्याचे कच्चे किंवा पाण्यात उकळूनही सेवन करू शकता.
- नारळपाणी : नारळाच्या पाण्यात इलेक्ट्रोलाइट्स आणि खनिजे भरपूर प्रमाणात असतात. हे हायड्रेशनची पातळी सुधारून किंवा पुर्ववत करण्यात आणि पोटाला स्थिर होण्यास मदत करू शकतात. शिवाय, त्यात चरबी आणि कॅलरीज कमी असतात ज्यामुळे मळमळ किंवा पोट फुगल्यासारखे वाटत असलेल्या लोकांसाठी हे एक जबरदस्त पेय बनते. पुढच्या वेळी पावसाळ्यात तुम्हाला थोडीशीही पोटात गडबड वाटेल तेव्हा एक ग्लास ताजे नारळ पाणी नक्की प्या.

## तर खा दही

पाणी आणि अन्नजन्य संसर्गाचा धोका वाढल्याने पावसाळा पोटासाठी खडतर काळ असू शकतो. दररोज दह्याचे सेवन केल्याने पोटाच्या फ्लूच्या जोखमीचा सामना करण्यास मदत होते. दह्यामध्ये पोटाला हेल्दी ठेवणारे चांगले किंवा गुड बॅक्टेरिया असतात जे पचन सुधारण्यास आणि गॅस्ट्रोइंटेस्टाइनल इन्फेक्शनची समस्या कमी करण्यास मदत करतात. हा कॅल्शियम आणि प्रथिनांचे देखील एक चांगले स्त्रोत आहे आणि हे दोन्ही घटक आतड्यांच्या आरोग्यासाठी महत्वाचे आहेत.

- जिऱ्याचं पाणी : पोटाच्या गडबडीमध्ये किंवा पोट खराब असताना जिऱ्याचे पाणी फायदेशीर ठरू शकते. वास्तविक, त्यात गॅस्ट्रोप्रोटेक्टिव्ह गुणधर्म असतात, जे अपचन, पोटदुखी, जळजळ, गॅस, पोट फुगणे, उलट्या आणि मळमळ यांसारख्या पोटाच्या आणि आतड्यांसंबंधी समस्यांपासून मुक्त होण्यास मदत करू शकतात.




- पुदीना खा : पुदीना पोट खराब असताना दिसणारी लक्षणे कमी करण्याचे काम करते. फार पूर्वीच्या काळापासूनच याचा उपयोग अपचन आणि त्याची लक्षणे जसे की गॅस, ॲसिडिटी आणि मळमळ, उलट्या दूर करण्यासाठी केला जातो. त्याचवेळी, जर्नल ऑफ फार्मास्युटिकल अँड रिसर्चमधील संशोधनात असेही आढळून आले आहे की, त्यात अँटी-स्पास्मोडिक गुणधर्म आहेत, ज्यामुळे पोटदुखी कमी होण्यास मदत होते.

# हसा अन् सुंदर दिसा

**चेहऱ्यावरील जादाच्या चरबीमुळे डबल चीन दिसायला लागते, सुंदर असा नैसर्गिक चेहरा आपला आकार बदलू लागतो आणि 'फॅटी फेसकट' बनतो. मग मेकअप करून किंवा बदलत्या चेहऱ्याकडे साफ दुर्लक्ष करून त्याचं वाढतं 'वजन' लपवण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र, चेहऱ्यावरही चरबी साचत जाते आणि ते वेळीच कमी करणं आवश्यक आहे हे कुणाच्या लक्षात येत नाही.**



मानेपासून खालच्या अवयवासांठी आवर्जून व्यायाम केला जातो; पण चेहऱ्यासाठी म्हणून कुणी व्यायाम करत नाही. असाही व्यायाम असतो हे अनेकांना माहीतच नसतं. त्यामुळे व्यायामानं कमनीय बांधा किंवा फिटनेस मिळवायचा असेल, तर चेहऱ्याला विसरून चालणार नाही. कारण तोच आपल्या आरोग्याची पावती देणारा महत्त्वाचा अवयव आहे. चेहरा हाच आपल्या आरोग्याचा आरसा असं म्हणा हवं तर. त्याचे व्यायाम अगदी साधे-सोपे आणि कधीही करता येण्याजोगे आहेत.



- हवा भरा : तोंडात खूप हवा भरा, फुग्यात भरतो तशी. यामुळे गाल फुगतील. पाच ते सात सेकंद अशी स्थिती ठेवा. हवेनं भरलेल्या गालाला हातानं हलकाच दाब द्या. एकदा डावा आणि एकदा उजवा असा क्रम ठेवा. आठ वेळा ही क्रिया करा. यामुळे गालाच्या स्नायूंना आराम मिळेल.
- लायन फेस : तोंड जितक्या मोठ्या आकारानं उघडता येईल त्या आकारानं उघडा. श्वास बाहेर सोडा. पुन्हा हवा आत घ्या आणि तोंड बंद करा. दोन ते तीन मिनिटं असं करा. या व्यायामाला लायन फेस असं म्हणतात.
- ओठांची हालचाल : खालील ओठांनी वरच्या ओठांना झाकण्याचा प्रयत्न करा. यामुळे हनुवटीकडील भागाचं स्ट्रेचिंग होईल. १० सेकंद ही क्रिया करा. मान पुढच्या आणि मागच्या बाजूला ताणा. यामुळे मानेवरील चरबी कमी होण्यास मदत होईल.
- हसा आणि हसा : हो. तुम्ही बरोबर वाचलंत. खदखदून हसा. मनसोक्त, निखळ असं हास्य तुमच्या चेहऱ्यावर सतत ठेवा. सध्या अनेक हास्य क्लब मोठ्या प्रतिसादात सुरू आहेत, कारण त्यामध्ये सहभागी होणाऱ्यांना हसण्यामुळे हृदयाचं कार्य सुरळित चालतं याबरोबरच त्यामुळे सौंदर्य मिळतं हे समजलंय. सौंदर्य मिळवण्यासाठी हसण्याची क्रिया खूप लाभदायी ठरते. हसा आणि हसल्यानंतर खुलणारे ओठ जरा बाजूला ओढा. त्यांचं चक्क स्ट्रेचिंग करा. कमीत कमी पाचवेळा असं करा. हसण्यामुळे चेहऱ्याचे स्नायू ताणले जातात आणि त्यांना व्यायाम मिळतो.

# पावसाळ्यात घ्या हलका आहार!

**पावसाळ्यात विविध आजारांविषयी आपल्याला माहिती असते. मात्र, पावसाळ्यात आहार कोणता घ्यावा, याची पुरेशी माहिती घेतली जात नाही. चुकीच्या आहाराच्या पद्धतीमुळे पोटदुखी, गॅस, अपचनासोबत पोटाच्या तक्रारी त्रास देण्याची शक्यता असते. त्यामुळे आहारात काही विशिष्ट पदार्थांचे सेवन न करणे चांगले. पावसाळ्यात जठराग्नी मंद झालेला असतो. त्यामुळे खूप खावेसे वाटले तरी अन्नाचे पचन मात्र चांगले होत नाही. या ऋतूत पचनास अतिशय हलका असलेला आहार घ्यायला हवा. काहीवेळा खूप खाल्ल्याने पोटाच्या व्याधी निर्माण होतात.**

## आहार कसा असावा?

- पचनास हलक असणारा आहार घ्यावा.
- खूप खा खा करू नये.
- तळलेले, भाजलेले पदार्थ खूप प्रमाणात खाऊ नये.
- मांस, अतिउष्ण पदार्थ यांचा अतिरेक टाळावा.
- पित्त वाढवणारे पदार्थ या काळात खाऊ नयेत.
- आहारात सुंठ, मिरी, हिंग, लसूण, जिरे, बडीशेप यांचा समावेश करावा
- पावसाळ्यात दोन आहारांमध्ये अंतर ठेवून खावे.
- ताप वा अन्य आजारांत मूग डाळीचे वरण, हलक्या भाताची पेज, मऊ फुलके यांचा समावेश असावा.
- धान्याच्या लाह्या, भाजलेले व भरड काढलेल्या मुगाच्या डाळीचे कढणही या ऋतूत पोषक असते.
- पालेभाज्यांचे प्रमाण कमी करावे. मात्र, फळभाज्या स्वच्छ करून आहारात त्याचा समावेश करावा. कारले, दुधी भोपळा, कारले, पडवळ, भेंडी, मोड आलेली कडधान्ये आहारात जरूर असावीत.
- आहारात तुपाचा समावेश आवर्जून करावा. त्यामुळे पित्त, वातदोष कमी होतो.
- तळलेले पदार्थ पचण्यास जड असतात. त्यामुळे पित्त वाढते. हे पदार्थ खाणे टाळावे.
- फळे खाताना ती स्वच्छ करून, धुवूनच खावीत. अधिक पिकलेली फळे या काळात शरीरास कुपथ्य ठरू शकतात.
- पावसाळ्यात ताजा गरम आहार घ्यावा. पचनास जड असेल असा आहार टाळावा.
- लहान मुलांना मऊ पेज, गरम दूध, मूगाच्या डाळीचे वरण, मसाला व कमी तेल घातलेल्या भाज्या, ताजी फळे, टोमॅटो सूप असे पदार्थ आवर्जून द्यावेत.
- पाणी स्वच्छ व उकळून थंड केलेले असावे.
- गरमागरम पदार्थ खाण्याचा कितीही मोह झाला तरीही उघड्यावरचे, बाहेरचे पदार्थ खाणे टाळावे. त्याने जंतुसंसर्ग होऊ शकतो.

## आजारी व्यक्तींचा आहार

- पचनास हलके असे सूप, मऊ केलेली भाताची पेज घ्यावी.
- सफरचंद, केळे शक्यतो टाळावे.
- नारळपाणी पिऊ नये.
- बीट वा गाजर खावे. काकडी खाऊ नये.
- तळलेले पदार्थ टाळावेत.
- आजारातून उठल्यावर त्वरित जड वा चमचमीत पदार्थ खाऊ नयेत. या पदार्थांमुळे पुन्हा आजार बळावतो.



- डॉक्टरांना औषधानुरूप कोणता आहार घ्यायचे, हे जरूर विचारावे.

# महाराष्ट्र विधिमंडळाचा इतिहास प्रेरणादायी –राज्यपाल राधाकृष्णन

## अंदाज समिती अमृत महोत्सव राष्ट्रीय परिषदेचा समारोप



**मुंबई (प्रतिनिधी) –** देशाच्या विकासात अंदाज समिती तसेच वित्तीय समित्यांची महत्वपूर्ण भूमिका असून पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुशासनाचा कणा आहेत. महाराष्ट्र विधिमंडळाचा इतिहास गौरवशाली आणि प्रेरणादायी राहिला आहे. महाराष्ट्राने देशाला अनेक कल्पक योजना दिल्या आहेत, असे गौरवोद्गार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काढले.

संसदेतील व सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील अंदाज समित्यांच्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा समारोप राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत झाला. याप्रसंगी राज्यसभा उपसभापती हरिवंश, अंदाज समितीचे अध्यक्ष डॉ. संजय जैसवाल, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महाराष्ट्र विधानमंडळाचे समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर, विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, संसद आणि सर्व राज्ये व संघ राज्य क्षेत्रांच्या प्राक्कलन समित्यांचे अध्यक्ष व सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळाचे सदस्य आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन म्हणाले की, महाराष्ट्र ही भक्ती, शक्ती आणि प्रगतीची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची पायाभरणी केली. सन १९७० मध्ये महाराष्ट्राने रोजगार हमी योजना सुरू केली ती देशाने स्वीकारली. सरकारी खर्चाचे नियोजन, कार्यक्षमतेचे मूल्यमापन आणि धोरणात्मक सुधारणा यामध्ये अंदाज समित्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. भारताची जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल सुरू असून हा अमृतकाळ महत्वपूर्ण ठरेल, असेही राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी सांगितले.

# साहित्यिक विलास सिंदगीकर यांच्या 'जीवन' कवितेचा सीबीएसई आणि आयसीएसई अभ्यासक्रमात समावेश



**जळकोट (प्रतिनिधी) –** जळकोट तालुक्यातील केकत सिंदगी (जि.लातूर) येथील क्रांती माध्यमिक विद्यालयाचे उपक्रमशील मुख्याध्यापक तथा साहित्यिक, कवी विलास सिंदगीकर यांची 'जीवन' कविता स्वायत सीबीएसई व आयसीएसई व इतर स्वायत्त शाळांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आली आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० नुसार स्वायत सीबीएसई व आयसीएसई व इतर स्वायत्त शाळांसाठी सार एज्युकेशन प्रायवेट लिमिटेड, मुंबई यांच्या तर्फे स्माईल एज्युकेशन कॅरिकुलम अंतर्गत पाठयपुस्तक मराठी इयत्ता ६ वी वर्गासाठी तयार करण्यात आलेल्या मराठीच्या पाठयपुस्तकात लावण्यात आली आहे, असे डॉ. लतिका भानुशाली यांनी कळविले आहे .

मुख्याध्यापक विलास सिंदगीकर यांचे ३० वर्षांपासून महाराष्ट्रात साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक चळवळीत उल्लेखनीय योगदान आहे. त्यांचे 'भूकबळी', 'गारपीट', 'उतरंड', 'रक्त आणि भाकर', 'बाजार', 'ढगा ढगा धाव रे', 'पाऊसझडी', 'आनंदगाणी', 'अमृतधारा', 'गीत निळ्या आकाशाचे' आदी ग्रंथ प्रकाशित आहेत.




यापूर्वी महाराष्ट्र सरकारने त्यांना स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्काराने सन्मानित केले आहे. तसेच राज्याच्या इ.४ थी मराठी 'बालभारती'मध्ये त्यांची 'आभाळमाया' समाविष्ट आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या एम. ए. (मराठी) द्वितीय वर्षासाठी 'गारपीट' कथासंग्रह समाविष्ट आहे. तसेच एमजीएम विद्यापीठाच्या एम.ए. प्रथम वर्षासाठी त्यांचा 'भूकबळी' कथासंग्रह अभ्यासला जातो. आणि आता सीबीएसई व आयसीएसईच्या अभ्यासक्रमात संत जनाबाई, वसंत बापट, डॉ. सुरेश सावंत, मीना नाईक आणि मोहन काळे यांच्या कवितांबरोबरच विलास सिंदगीकर यांच्या 'जीवन' या कवितेचा समावेश झाला आहे.

# सामाजिक न्याय दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**लातुर (प्रतिनिधी) –** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त २६ जून २०२५ रोजी लातूर येथे सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात येणार आहे. सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी आणि मागासवर्गीय, दिव्यांग, वृद्ध, निराधार व दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी शाहू महाराजांनी केलेल्या कार्याचा आदर्श समाजापुढे यावा, यासाठी हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो.

या निमित्ताने सकाळी ७:३० वाजता राजर्षी छत्रपती शाहू महाराज चौक येथे समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्तांच्या उपस्थितीत शाहू महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून समता दिंडीचे आयोजन करण्यात येणार आहे.

## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे
न्यायालय किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०७/२०२५
सलामा बेगम व इतर विरुध्द शाखाधिकारी

अर्जदार :-१.सलमा बेगम सय्यद रज्जाक वय २२ वर्षे, २.बिलाल सय्यद रज्जाक वय ३ वर्षे,३.दनिश सय्यद रज्जाक वय १ वर्षे अर्जदार २ व ३ अपाक अर्जदार क्र. १ आई सर्व बेळकोणी ता.बिलोली जि.नांदेड ह.मु.कल्हाळ

विरूध्द -शाखाधिकारी बुलढाणा अर्बण सह क्रेडीड बँक लि.शाखा बिलोली ता.बिलोली जि.नांदेड

विषय : उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत रज्जाक मौलाशहा सय्यद अर्जदार ही पत्नी आहे.मयत रज्जाक मौलाशहा सय्यद यांचा मुत्यू दिनांक १४/६/२०२२ रोजी झाला.अर्जदार हे मौजे बेळकोणी ता.बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी होते मयत रज्जाक मौलाशहा सय्यद यांनी त्यांच्या हयाती मध्ये गैरअर्जदार बुलढाणा अर्बण सह क्रेडीड बँक लि.शाखा बिलोली ता.बिलोली जि.नांदेड या बँकेत सोने गहाण ठेवून कर्ज उचलले होते.सदर सोने परत घेण्यासाठी अर्जदार हे गैरअर्जदार यांच्या बँकेत गेले असता त्यांनी अर्जदारास उत्ताधिकारी प्रमाणपत्राची मागणी केली.त्यामुळे अर्जदारास सदर प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.बचत खाते तारण कर्जाच्या सदर करारावर अर्जदार क्र. १ व २ चे वारस नॉमीनी रक्यान्यात अर्जदार क्र.१ व २ चे नाव टाकलेले आहे. मयत यांना कुठलेच सदर दागिण्याची मालकी हक्क पोहचत नाही.त्यांना सदर प्रकणात पार्टी केली नाही.मयताच्या पश्चात मयताचे अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत.असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

हे की, मयत रज्जाक मौलाशहा सय्यद यांचे कायदेशिर वारस म्हण-न वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक २३/०७/२०२५ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.आज दि.१४ मे, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली**

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर बिलोली यांच्या
न्यायालयात,किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२० /२०२५ पु.ता.२५/७/२०२५

अर्जदार-१.प्रतिभा भ्र.नागनाथ शेटकर वय-५० वर्षे, व्यवसाय-घरकाम २. शुभम पि. नागनाथ शेटकर,वय-२५ वर्षे, व्यवसाय-सुशिक्षीत बेकार ३.शिवराज पि. नागनाथ शेटकर वय २२ वर्षे व्यवसाय- शिक्षण ४.शुभांगी पि. नागनाथ शेटकर वय-२४ वर्षे, व्यवसाय-घरकाम सर्व रा.लोहगाव ता.बिलोली जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

विषय - वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला असून अर्जदाराचे असे कथन आहे की,अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत नागनाथ हरीदास शेटकर यांचे वारसा आहेत.अर्जदारांचे कथन आहे की अर्जदार क्र.१ ही मयत नागनाथ हरीदास शेटकरे यांची पत्नी असून अर्जदार क्र.अर्जदार क्र २ व ३ हे मयत नागनाथ हरीदास शेटकर यांचे मुले आहेत. व अर्जदार क्र.४ ही मुलगी आहे. मयत नागनाथ हरीदास शेटकर यांचा मृत्यू दिनांक ३०/८/२०२३ रोजी झाला.अर्जदार यांनी कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ ते ४ यांना मयत नागनाथ हरीदास शेटकर यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत ३० दिवसात या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.आज दि.१७ जुन, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली**

## जाहीर प्रगटन

संचिका क्रमांक. २१९/४०/२०२५- २०२६/
क्षे.का.क्र.१ तरोडा सांगवी

प्रकरण :- नांव परिवर्तन करणे बाबत.

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सौ.इंदिरा लक्ष्मण संदुपडलेवार रा.तरोडा खूर्द नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की,तानिभूअ पत्र क्र.१०५१/९ दिनांक ३०/१०/२००९ तरोडा खुर्द गट नंबर १५६ पैकी प्लॉट नंबर २३ चा दक्षिणेकडील भाग घर पिन क्र.४०६०१०५८९४ आहे. शिरीष लक्ष्मण संदुपडलेवार यांच्या नावे नोंद असलेली मालमत्ता यांचेकडून अर्ज खरेदी खत क्र.५७२२ दिनांक २३/८/२०२४ च्या अधारे विकत घेतली आहे/ वारसाहक्क प्राप्त झाली आहे.

तरी त्यांचे नावाची नोंद नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. तरी या सबंधात कोणी काही आक्षेप असल्यास त्यांना हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेच्या १५ दिवसांच्याआत कार्यालयात आ-पला लेखी आक्षेप पुराव्यासह दाखल करावा.अन्यथा वरील अवधी संपल्यानंतर सदरील मालमत्तेवर अर्जदाराचे नावाने मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत सदरील नावाची नोंद घेण्यात येईल.

**चर्तुसिमा-पुर्वेस-नांदेड ते मालेगाव रोड,पश्चिमेस-प्लॉट नंबर ३४ व ३५, दक्षिणेस-प्लॉट नंबर २२,उत्तरेस-प्लॉट नंबर २३ चा भाग**

**क्षेत्रिय अधिकारी**
**क्षेत्रिय कार्यालय क्र.१ तरोडा- सांगवी**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका**

**जय जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित**
**वसराम आदुनाईक मागासवर्गीय वसतिगृह निराळा तांडा**
**ता.किनवट जि.नांदेड मान्य संख्या २०+४=२४**

## प्रवेश देणे चालू आहे.

५ ते १० वी विद्यार्थ्यांना शासनमान्य अनुदानित वसतिगृहात सन २०२५-२०२६ शैक्षणिक वर्षात जातीनिहाय विहित टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे.

टिप : विनामूल्य प्रवेश देण्यात येईल.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (एस.सी.) | ६७ टक्के |
| २ | अनुसूचित जमाती (एस.टी.) | १४ टक्के |
| ३ | वि.जा./भ.ज./व्ही.जे./एन.टी. | १७ टक्के |
| ४ | विशेष मागास प्रवर्ग एस.बी.सी. | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग ओबीसी | १५ टक्के |
| ६ | आर्थिकदृष्ट्या मागासप्रवर्ग ओपन | ५ टक्के |
| | एकूण | १२० |

१) प्रशस्त इमारत २) खेळाचे मैदान ३) मुबलक पाण्याची सोय ४) विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष ५) सुसज्ज ग्रंथालय ६) निसर्गरम्य वातावरण ७) नियमित अभ्यास ८) लाईटची व्यवस्था ९) दररोज योगासने व व्यायाम १०) विशेष मार्गदर्शन गरजू व गरीब विद्यार्थ्यांनी या सुवर्ण संधीचा आवश्य लाभ घ्यावा.

**अध्यक्ष/अधिक्षक**
**वसराम अदुनाईक मागासवर्गीय वसतिगृह**
**निराळा तांडा ता.किनवट जि.नांदेड**
**९९२१३९१४३९/९५२७५९०६६२**




## प्लॉट विकणे आहे

प्लॉट क्रमांक ७१ गट क्रमांक ३५८ तरोडा बुद्रुक, अंबिका सन सिटी ,शिव रोड तरोडा ( बु)येथील १२०० स्केअर फुटाचा दक्षिणमुखी तीस फुटाचे रोडवरील प्लॉट वाजवी किंमत आल्यास विकने आहे

**-:संपर्क-८६९८६९१२५७**

## Change In Name

I, WAQID GAZWAN HUSSAIN, son of Mohammed Majid Hussain, residing at, 42, Somaiya Nagar, B and C Colony, Taroda BK, Nanded – 431605, MS. Have changed my name from WAQID GAZWAN HUSSAIN to WAQID GHAZWAN HUSSAIN with effect from 01/06/2025. Henceforth, I shall be known as WAQID GHAZWAN HUSSAIN son of MOHAMMED MAJID HUSSAIN. For all purposes.

## Change In Name

I, MOHAMMED MAJID HUSSAIN father of KHADEEJA AAFEEN, Age 9 years, residing at, 42, Somaiya Nagar, B and C Colony, Taroda BK, Nanded – 431605, MS. Hereby declare that I have changed the name of my child from KHADEEJA AAFEEN daughter of MOHAMMED MAJID AHMED HUSSAIN to KHADIJA AAFIN daughter of MOHAMMED MAJID HUSSAIN with effect from 13/06/2025. Henceforth, she shall be known as KHADIJA AAFIN daughter of MOHAMMED MAJID HUSSAIN. For all purposes.

## टी.सी.हरवली

मी कृष्णा दत्तू सपकाळ या नावची इयत्ता १२ वी (विज्ञान) पासची टि.सी मुखेड ते नांदेड बस मधून प्रवास करीत असताना हरवली आहे तरी कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर आणून देण्यात यावी -

**-संपर्क पत्ता -**
**कृष्णा दत्तु सपकाळ**
**विद्यानिकेतन कमळेवाडी**
**ता.मुखेड जि.नांदेड**

## टी.सी.हरवली

मी प्रसाद सुधाकर बगाडे लातूर ते नांदेड बस मधून प्रवास करीत असताना माझी इयत्ता बारावी पासची टीसी हरवली आहे तरी कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर आणून देण्यात यावी --**संपर्क पत्ता -**

**प्रसाद सुधाकर बगाडे**
**मु. पो. डोंगरगाव ता. लोहा**
**जि. नांदेड**
**पिन कोड ४३१७०८**
**मो. ८०१०१७३९६८**

## टी.सी.हरवली

माझी पठाण जाफरखान महमदखान या नावाची इयत्ता १० वी पास ची टि सी नरसी ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**-संपर्क पत्ता-**
**पठाण जाफरखान**
**महमदखान मु.पो सावळी ता बिलोली जिल्हा नांदेड**
**सं.९५०३८१२०१३**

शासना मान्य स्वंयअर्थसाय्यीत शाळा स्वराली
बहूउद्देशीय सेवाभावी संस्था करडखेड संचलीत

**श्री सरस्वती विद्यालय करडखेड ता.देगलूर जि.नांदेड**

UDISE-27154100087

# पाहिजेत

इंग्रजी माध्यमाच्या वर्ग १ ली ते ५ वी शिक्षक पाहिजेत

| अ.क्र | पद | संख्या | विषय | पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्याध्यापक | १ | इंग्रजी | एम.ए.बि.एड |
| २ | सहशिक्षक | ५ | मराठी,इंग्रजी, गणित,विज्ञान हिंदी | डि.एड.बि.एड बी.ए |
| | लिपीक | १ | - | |
| ३ | शिपाई | १ | - | - |

नोट-उमेदवार इंग्रजी माध्यातुन शिक्षण घेतलेला असावा.इंग्रजी माध्यमाचा उमेदवार न मिळाल्यास इतर माध्यमाचा विचार केला जाईल.मुलाखतीस येणाऱ्यांना प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

**मुलाखत दिनांक** २८/६/२०२५ शनिवार वेळ १२.०० वाजता

**प्राचार्य** **सचिव**
**श्री सरस्वती विद्यालय**
**करडखेड ता.देगलूर जि.नांदेड**
**मो.९९७५८४०५३०**

# ह.गो.पा.शि.प्रसारक मंडळाचे पानसरे महाविद्यालय अर्जापुर

## WALK IN INTERVIEW

आमच्या वरिष्ठ महाविद्यालयात सन २०२५ - २६ या शैक्षणिक वर्षासाठी घड्याळी तासिका तत्वावर अधिव्याख्यात्यांची तात्पुरत्या स्वरुपात मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांचे पत्र क्रमांक क्र. विशिससं / उशि/नावी / अनु- २/२०२५-२६/६२६ दिनांक १६/०४/२०२५ नुसार खालील रिक्त पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र | विषय | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | सहाय्यक प्राध्यापक | २ | एम.ए.नेट/सेट/पीएच.डी | घड्याळी तासिका तत्वार |
| २ | शा.शिक्षण | सहाय्यक प्राध्यापक | ३ | एम.पी.एड/नेट/सेट/ पीएच.डी | घड्याळी तासिका तत्वार |
| ३ | इतिहास | सहाय्यक प्राध्यापक | १ | एम.ए.नेट/सेट/पीएच.डी | घड्याळी तासिका तत्वार |
| ४ | लोकप्रशासन | सहाय्यक प्राध्यापक | १ | एम.ए.नेट/सेट/पीएच.डी | घड्याळी तासिका तत्वार |
| ५ | अर्थशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक | १ | एम.ए.नेट/सेट/पीएच.डी | घड्याळी तासिका तत्वार |
| | एकूण | | ८ | | |

**कायम विनाअनुदानित पदवीव्युत्तर**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | इतिहास | सहाय्यक प्राध्यापक | २ | एम.ए.नेट/सेट/पीएच.डी |

युजीसी व म.शा.नि. सं-२०१८/(१८५/१८)मशि-३ दि.१४/११/ २०१८ नुसार ठरवून दिलेल्या शैक्षणिक पात्रता अधिन राहून (२) म.शा. नि. सं-२०१८ / (१८५ /१८) मशि-३ दि.१४/११/ २०१८ नुसार वेतन व मानधन शासनाकडून आर्थिक तरतूत झाल्यानंतर मान्य होईल. (३) नेट/सेट/ पीएच.डी. उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांची अर्ज व शैक्षणिक कागदपत्रांसह मुलाखतीस उपस्थित राहावे. (४) मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांना प्रवास / दैनिक भत्ता दिला जाणार नाही.

**मुलाखतीस दिनांक १/७/२०२५ (मंगळवार )वेळ सकाळी ११.०० वाजता**
**नाव नोंदणी सकाळी ९ ते १० पर्यंत स्थळ-कार्यालय पानसरे महाविद्यालय,अर्जापुर**

**नागनाथ संतुकराव पाटील सावळीकर**
अध्यक्ष
ह.गो.शि.प्र.मंडळ
बिलोली पो.कुंडवाडील जि.नांदेड

**बेजगमवार सुनिल रमाकांत**
प्राचार्य
ह.गो.शि.प्र.मंडळ बिलोली पो.
कुंडवाडील जि.नांदेड

**डॉ.गायवाड आर.जे**
सचिव
पानसरे महाविद्यालय
अर्जापुर
ता.बिलोली जि.नांदेड

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## केदारेश्वर सत्संग भवनामध्ये त्रिवेणी संगम योगात शिवरात्रौत्सव उत्साहात




**नांदेड (प्रतिनिधी)–** आनंदनगर येथील श्री केदारेश्वर सत्संग भवनामध्ये शिवरात्री, सोमवार आणि प्रदोष या त्रिवेणी योगात शिवरात्री उत्सव उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या पवित्र उत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे श्री केदारनाथ रावल पदवी विभूषित वैराग्य सिंहासनाधीश्वर श्री श्री १००८ श्री भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांचे दिव्य सान्निध्य आणि आशीर्वाद लाभले.

यावेळी श्री केदारगडगुरु महाराजांनी 'त्रिवेणी संगम योगाचे आध्यात्मिक महत्त्व' भाविकांसमोर अत्यंत सुलभ व प्रभावी शब्दात विशद केले. त्यांच्या विचारांनी संपूर्ण सभागृहात एक उर्जादायी भक्तिभाव निर्माण झाला.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी राज्यमंत्री डी. पी. सावंत आणि सौ. रंजनाताई सावंत यांनी केदारेश्वर सत्संग भवनाच्या सेवाकार्याचे आणि अध्यात्मिक उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. प्रारंभी केदारेश्वर भवन येथे श्री एकोरामाराध्य मूर्तीचे रुद्राभिषेक व पूजन स्वामी वीरभद्र व स्वामी रामलिंग यांच्या हस्ते झाला. केदार जगतुगुरु आशीर्वचन तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. शिवरात्री उत्सवास बालाजी पांडागळे, संतोष पांडागळे, मनोहर भोसीकर, माधवराव कहाळेकर, गोविंद नांदेडे, शिवाजी कपाळे, राजु एकलारे, माधवराव पटने, जयचंद तत्तापुरे, मंजुताई माळी, सतिश सामते, कमल कोठारी, शिवाजीराव कहाळेकर, विश्वंभर भोसीकर, किशोर पाटणी, रवी कासलीवाल, रमेश मिरजकर, भगवान मानधने, प्रा. प्रभाकर उदगीरे, नंदकुमार दुधेवार यांच्यासह अनेक भक्तांची उपस्थिती होती.

या उत्सवात सालासर भजन मंडळ, नांदेड यांनी आपल्या सुमधुर भक्तिगीतांनी वातावरण भक्तिरसपूर्ण केले. होकर्णे बंधू विजय, भारत, महेश आणि श्री केदारेश्वर सत्संग भवन सेवा समिती, आनंदनगर, नांदेड यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## १ जुलै रोजी जिल्हा परिषदेत कृषी दिनाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांनी कृषिक्षेत्रात केलेल्या भरीव योगदानाबद्दल १ जुलै हा दिवस त्यांचा वाढदिवस राज्यात कृषिदिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी १ जुलै २०२५ रोजी जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत कृषिदिन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या अध्यक्षतेखाली कै. यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद, नांदेड येथे साजरा करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात सेंद्रीय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, विद्यापीठ शास्त्रज्ञ, जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी, कृषी विभाग महाराष्ट्र शासन, आत्मा नांदेडचे सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच जिल्ह्यातील राज्य पुरस्कार प्राप्त शेतकरी, शेती क्षेत्रात उल्लेखनिय काम करणारे शेतकरी व महिला, शेंद्रीय शेती करणारे शेतकरी, माध्यम प्रतिनिधी यांची उपस्थिती राहणार आहे, असे जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी यांनी कळविले आहे.

## इतवारा पोलिसांची जुगार अड्ड्यावर कारवाई; दहा जणांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कारवाई केली. यावेळी पोलिसांनी दहा जणांना अटक केली असून त्यांच्याकडून नगदी ५४ हजार ३१० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले आहे. ही कारवाई २३ जून रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास भोईगल्ली हातजोडी परिसरात करण्यात आली.

शहराच्या जुन्या नांदेड भागात भोईगल्ली हातजोडी परिसरात आशिष बालाजी गोणेवार (वय २०) हा इतर सहकाऱ्यांसोबत जुगार अड्डा चालवत होता. ही माहिती पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांना समजताच त्यांनी उपविभागीय अधिकारी सुशीलकुमार नायक यांना माहिती दिली. नायक यांनी पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे यांना सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले.

भोईटे यांनी आपल्या अन्य सहकाऱ्यांना सोबत घेऊन भोईगल्ली हातजोडी परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर कारवाई केली. यावेळी आशिष बालाजी गोणेवार याच्यासह नऊ जणांना अटक केली. त्यांच्याकडून रोख रक्कम ५४ हजार ३१० जुगाराचे साहित्य जप्त केले. पोलीस हवालदार लक्ष्मण दासरवार यांच्या फिर्यादीवरून इतवारा पोलीस ठाण्यात दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार रहमान करत आहेत.

यासोबतच इस्लामपुरा ब्रिजच्या बाजूला संतोष श्याम भारती (वय ३०) रा. लक्ष्मीनगर हा 'मिलन डे' नावाचा मटका जुगार खेळवत होता. त्यालाही पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून अडीच हजार रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले. पोलीस हवालदार हरप्रीतसिंग सुख्ई यांच्या फिर्यादीवरून आरोपी संतोष भारतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस हवालदार बेडदे करत आहेत.

**देगलूरमध्येही मटका बुक्कीवर कारवाई**

देगलूर तालुक्यातील खानापूर फाटा येथे हनुमंत गंगाधर शेळके हा विनापरवाना बेकायदेशीरित्या कल्याण नावाचा मटका खेळवत होता. त्याला पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून पाच हजार एकशे चाळीस रुपये, दोन किमती मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला. पोलीस अंमलदार नामदेव शिरोळे यांच्या फिर्यादीवरून देगलूर पोलीस ठाण्यात हनुमंत शेळकेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार पुरी करत आहेत.

## मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रम समितीवर धनंजय तांबेकर

### पतसंस्था व्यवस्थापन पदविकेचा अभ्यासक्रम करणार तयार

**नांदेड (प्रतिनिधी)–** गोदावरी अर्बन मल्टिस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ धनंजय तांबेकर यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'पतसंस्था व्यवस्थापन पदविका' अभ्यासक्रम समितीवर निवड झाली आहे.



नाशिक येथील मुक्त विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतर्फे 'डिप्लोमा इन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी मॅनेजमेंट'हा नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. याच अभ्यासक्रमाचा विषयनिहाय अभ्यासक्रम तयार करण्यासाठी तज्ज्ञ सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीत 'सहकारी पतसंस्थांचे व्यवस्थापन' या विषयासाठी धनंजय तांबेकर यांची विषयतज्ज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली. या विषयाच्या समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. रवींद्र भोसले काम पाहणार आहेत. सहकार क्षेत्रातील तांबेकर यांचे महत्त्वपूर्ण योगदान आणि ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांना व्हावा, या उद्देशाने ही निवड केल्याचे विद्यापीठाने पत्रात नमूद केले आहे. यासंदर्भातील बैठक २७ मे रोजी विद्यापीठाच्या मुख्यालयात नाशिक येथे पार पडली.

## नागरी समस्यांसाठी पालिकेवर मोर्चा काढणार –एकनाथ मोरे

**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा शहरात प्रचंड घाणीचे साम्राज्य पसरले आहे. तसेच पाणीपुरवठा, घरकुल, दिवाबत्ती आदी जनतेच्या मुलभूत प्रश्नांवर काँग्रेस पक्षाच्या वतीने लोहा पालिकेवर प्रचंड मोर्चा काढणार असल्याची माहिती भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे लोहा-कंधार प्रभारी एकनाथ मोरे यांनी दिली.

लोहा शहरातील शासकीय विश्रामगृहात राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. त्याप्रसंगी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या पत्रकार परिषदेस माजी जि. प. सभापती संजय पाटील कराळे, माजी जि. प. सदस्य श्रीनिवास मोरे, कंधार तालुकाध्यक्ष संजय भोसीकर, माजी नगरसेवक वसंत पवार, गणेश घोरबांड, माजी उपनगराध्यक्ष सोनू संगेवार, माजी नगरसेविका पुष्पलता कापूरे, सरपंच बाबासाहेब बाबर, माजी पं. स. सदस्य डॉ. दत्ता गवळी मेकाले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

एकनाथ मोरे म्हणाले, अनेक दिवसांपासून शहरात सर्वत्र प्रचंड घाणीचे साम्राज्य पसरले असून शहर वाशीयांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच मूलभूत पाणी प्रश्न, दिवाबत्ती, घरकुल योजना आदी प्रश्न निर्माण झाले आहेत. यासंदर्भात काँग्रेस पक्षाच्या वतीने लवकरच लोहा पालिकेवर प्रचंड मोर्चा काढण्यात येणार आहे. यावेळी श्याम पाटील नळगे, गजानन कळसकर, बंडू रमण, सत्तार शेख, अमोल महामुने, अमोल ढवळे, बालाजी जाधव, कृष्णा दाभाडे, संजय पवार, दत्ता फुलपगार, विक्रांत नळगे, गजानन चव्हाण, विनोद पांचाळ, राम शेंडगे, भारत मस्के आदींसह बहुसंख्येने उपस्थिती होती.

## डॉ. सुरेश सावंत यांचा 'छावा'कडून सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड येथील साहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांना भारतीय राष्ट्रीय साहित्य अकादमीकडून सर्वोत्कृष्ट मराठी भाषा साहित्यातील पुरस्कार मिळाल्याबद्दल छावा या सामाजिक संघटनेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

२०२५ यावर्षीचा मराठी भाषा साहित्य अकादमीच्या पुरस्काराने नांदेडला सन्मानित केले आहे. नांदेड येथील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांच्या 'आभाळमाया' या बाल साहित्य कृतीला भारतीय साहित्य अकादमीने सन्मानित केले आहे. नांदेडला डॉ. सुरेश सावंत यांना मिळालेल्या या मराठी साहित्यातील सर्वोच्च बहुमानामुळे मंगळवारी छावा मराठा संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी छावा मराठा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर, छावाचे संघटक तथा लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद येथील प्राचार्य डॉ. कमलाकर कनसे, छावाचे प्रवक्ते तथा लालबहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रभाकर जाधव, प्रा. सतीश पवार,धनराज कदम बाभळीकर, आकाश पाटील ढगे, पांडुरंग पाटील जगदंबे,अर्जुन आवरे चिकणेकर यांची उपस्थिती होती.

## मारोतराव सुरकुटवार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील चौफाळा येथील ज्येष्ठ नागरिक मारोतराव सुरकुटवार (वय ९८) यांचे दि. २४ रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांच्यावर दि.२५ रोजी सकाळी ११ वाजता महर्षी मार्कंडेय घाट, चौफाळा नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात चार मुले, तीन मुली, सुना, नातुपंतू असा परिवार आहे. ज्येष्ठ नेते प्रल्हादराव सुरकुटवार, सेवानिवृत्त मुख्य अभियंता मुकुंदराव सुरकुटवार, डॉ. लक्ष्मीकांत सुरकुटवार, नरेंद्र सुरकुटवार यांचे ते वडील होत.

## बारडमध्ये एकाच रात्रीत पाच दुकाने फोडली

**मुदखेड (प्रतिनिधी)–** बारड येथे चोरट्यांनी एकाच रात्रीतून पाच दुकाने फोडून किराणा दुकानातील माल तसेच मेडिकल स्टोअर मधील माल लंपास केला. या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

या घटनेच्या दोन दिवस अगोदर मनोज काचेवर यांची पान टपरी फोडली. त्यानंतर दि. २३ रोजी मध्यरात्री भर रस्त्यावरील पाच दुकाने फोडली आहेत. यामध्ये ओमसाई किराणा, सुरज किराणा, गणेश किराणा, जयस्वाल मेडिकल तसेच भुजलक्ष्मी हॉटेलचा सुद्धा समावेश आहे.

चोरट्यांनी ओमसाई किराणा दुकानातील पंचवीस हजार रुपये किंमतीचा माल पळविल्याचे दुकान चालक स्वप्निल शिवाजीराव दंडे यांनी सांगितले आहे. सुरज किराणा दुकानातील रोख दोन हजार रुपये, तसेच गणेश किराणा या दुकानातील रोख तीन हजार रुपये व ३६ लिटर खाद्यतेल चोरट्यांनी लंपास केल्याचे भगवान संदलवाड यांनी सांगितले. जैस्वाल मेडिकलचे शटर तोडून रोख दोन हजार रुपये व दीड हजार रुपये किंमतीची साहित्य चोरले. माधव बने यांच्या हॉटेलमधील दीड हजार रुपये रोख पळविले आहे.

## दुबार पेरणीसाठी आर्थिक मदत उपलब्ध करून द्या; खा. रविंद्र चव्हाण यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** जून महिना संपत आला तरी पावसाने म्हणावी तशी दमदार हजेरी लावलेली नाही. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल झाला असून दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक सहाय्य मिळवून द्यावी, अशी मागणी खासदार प्रा. रविंद्र चव्हाण यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी केली आहे. परंतु पंधरा दिवसांपासून पाऊसाने दडी मारली असल्यामुळे शेतामध्ये पेरणी केलेले सर्वच बियाणे वाया जाण्याची शक्यता वाढली आहे. पावसाअभावी दुबार पेरणीचे मोठे संकट निर्माण झाले असून त्याचा आर्थिक भुर्दंड शेतकऱ्यांवर पडणार आहे. मध्यम व लहान शेतकरी कुटूंबांना दुबार पेरणीसाठी सद्यस्थितीमध्ये आर्थिक भार उचलणे परवडणारे नाही, त्यामुळे शासनाच्यावतीने शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी बी-बियाणे व त्यासाठी लागणारे खते व औषधी खरेदी करण्यासाठी आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात यावे, अशी मागणी खासदार प्रा. रविंद्र चव्हाण यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्फत राज्य शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## शिवसेना नांदेड दक्षिण विधानसभा प्रमुखपदी हणमंत भवर, तालुका अध्यक्ष नंदू वैद्य, संघटकपदी तुकाराम पांचाळ

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** शिवसेना ठाकरे गटाच्या नांदेड दक्षिण विधानसभा प्रमुखपदी कांकाडी येथील हणमंत भवर, नांदेड दक्षिण तालुका अध्यक्षपदी असर्जन येथील नंदू पाटील वैद्य तर नांदेड दक्षिण विधानसभा संघटक पदी तुकाराम पांचाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार व मराठवाडा विभागीय नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, उपनेते तथा जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात, जिल्हाप्रमुख भुंजगराव पाटील डक, उपजिल्हाप्रमुख व्यंकोबा येडे यांच्या नेतृत्वाखाली या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.



नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी टाकलेला विश्वास व जबाबदारी समर्थपणे पार पाडणार आहोत, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. या निवडीबद्दल हणमंत भवर, नंदू पाटील वैद्य व तुकाराम पांचाळ यांचे तालुक्यात सर्वत्र मित्र मंडळींकडून व शिवसैनिकांमधून अभिनंदन करण्यात येत आहे.

## मोगलाजी अक्यमवार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** निलगिरी सोसायटी तरोडा बुद्रुक भागातील सेवानिवृत्त पोस्ट मॅनेजर मोगलाजी हुल्लाजी अक्यमवार (वय ७२) यांचे २४ जून रोजी निधन झाले. त्यांच्यावर पार्थिवावर मंगळवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, दोन मुले, डॉ. समीर, आदित्य, जावई नातवंडे असा परिवार आहे.

## दिलीप ढेपे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** वाळकी् खुर्द (ता.लोहा) येथील दिलीप व्यकंटी ढेपे (वय ५१) यांचे २४ जून रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, सून, दोन मुली, जावई नातवंडे असा परिवार आहे. मारोती ढेपे यांचे वडील तर कंपनी सुपरवायझर गुलाब ढेपे यांचे ते थोरले बंधू होत.

## सौ.पार्वतीबाई शुरकांबळे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** जनता कॉलनी येथील ज्येष्ठ उपासिका पार्वतीबाई लिंगराम शुरकांबळे (वय ८५) यांचे २४ जून सायंकाळी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा २५ जून रोजी सकाळी ११.३० वाजता निघून शांतीधाम गोवर्धनघाट नांदेड येथे अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात पती, चार मुले, सुना, चार मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. राजकुमार शुरकांबळे यांच्या त्या आई होत.

## खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला उज्जैनमध्ये अटक; 'स्थागुशा'ची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मध्यप्रदेशातील उज्जैनमधून अटक केली आहे. तो मागील काही दिवसापासून पोलिसांना गुंगारा देत होता.



वसरणी, गॅस गोडावून जवळील पंचवटीनगर येथील आरोपी कमलेश ऊर्फ आशु पाटील बालाजी लिंयापुरे (वय २५ वर्षे) हा खुनाच्या घटनेनंतर फरार झाला. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हे शाखेला या घटनेची उकल करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर स्थागुशआचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी सहायक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे व पोलीस अंमलदार यांचे पथक तयार करुन, तपास सुरु केला. पथकाने सायबर सेलच्या सहकार्याने आरोपी हा मध्यप्रदेशातील उज्जैन येथील रामघाट धर्मशाळेच्या परिसरात असल्याचे स्पष्ट झाले. स्थागुशाचे पथक थेट उज्जैनमध्ये पोहचले आणि स्थानिक पोलिसांच्या मदतीने आरोपी आशु पाटील याला ताब्यात घेतले. त्याने नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या दप्तरी नोंद असलेल्या गुन्ह्याच कबुली दिली. तो गुरनं ४५०/२०२५ १०३, १०९, ३५२, ३५१(२), ३५१(३), १८९(२), १९१(२), १९१(३), १९० भारतीय न्याय संहिता २०२३ सह कलम ३,४,२५,२७ भा.ह. कायदा मधील आरोपी असल्याचे निष्पन झाले.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या गुन्ह्याच्या तपासादरम्यान नागपुर, यवतमाळ, छत्रपती संभाजीनगर, तेलंगणा, उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेशला जावून आरोपीचा शोध घेतला. तांत्रीक माहितीच्या आधारे ग्राउंड वर्क करुन, शोध घेवून आरोपीस अटक करण्यात आली.

आरोपी आशु पाटील याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नांदेड आणले असून त्याला पुढील तपासासाठी नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

## झोपेत साप चाऊन एकाचा मृत्यू



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** झोपेत असतांना विषारी सापाने चावा घेतल्याने एका चाळीस वर्षीय इसमाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना कोपरा येथे २४ जून रोजी सकाळी उघडकीस आली.

कोपरा येथील साहेबराव डोईवाड हे नेहमी प्रमाणे दि. २३ जुन रोजी घरी जमिनीवर झोपले होते. झोपेत असतानाच पहाटेच्या सुमारास त्यांना विषारी साप चावला. त्यांना पुढील उपचारासाठी आधी मांजरम आरोग्य केंद्र व नंतर नायगाव येथील ग्रामीण रुग्णालयात हलविले. परंतु साहेबराव डोईवाड यांची प्रकृती अधिकच खालवल्याने त्यांना मुखेड येथील डॉ. पुंडे यांच्या रुग्णालयात भरती केले. पण उपचार सुरु असतानाच साहेबराव डोईवाड यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मुखेड पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे नायगाव तालुक्यासह कोपरा येथे हळहळ व्यक्त होत आहे. साहेबराव डोईवाड यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई, वडील, भाऊ असा परिवार आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com